


RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.३ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६




# अरबी समुद्रात मदतीसाठी गेलेले हलिकॉप्टर समुद्रात कोसळले

## दोन पायलटसह तीन जण बेपत्ता

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.३पोरबंदर**

भारतीय तटरक्षक दलाच्या एका हेलिकॉप्टरचा मोठा अपघात झाला आहे. गुजरातमधील पोरबंदरजवळ अरबी समुद्रात मदतीसाठी गेलेलं हे हलिकॉप्टर समुद्रात कोसळलं आहे. या दुर्घटनेनंतर हेलिकॉप्टरचे दोन्ही पायलट व एक डायव्हर बेपत्ता आहे. या हेलिकॉप्टरमध्ये चार जण होते. त्यापैकी एका व्यक्तीला (डायव्हर) बचाव पथकाने वाचवलं आहे. दरम्यान, अरबी समुद्रात हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले आहेत.



अरबी समुद्रात एक जहाज अडकलं होतं. त्यामुळे जहाजातील कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी तटरक्षक दलाला संदेश पाठवला. तटरक्षक दलाने या जहजावरील लोकांच्या मदतीसाठी एक हेलिकॉप्टर पाठवलं होतं. या हेलिकॉप्टरमध्ये दोन पायलट व दोन डायव्हर्स होते. मात्र हे हेलिकॉप्टर जहाजापर्यंत पोहोचायच्या आधीच समुद्रात कोसळलं. हेलिकॉप्टरमधील दोन्ही पायलट व एक डायव्हर बेपत्ता आहे. तर एका डायव्हरला बचाव पथकाने वाचवलं आहे. त्याची प्रकृती आता स्थिर आहे. पायलट्सना शोधण्यासाठी तटरक्षक दलाने शोहमोहीम हाती घेतली आहे. यासाठी चार जहाजं व दोन विमानं पाठवण्यात आली आहेत. तिघेही लवकरच सापडतील असा विश्वास तटरक्षक दलाने व्यक्त केला आहे.

भारतीय तटरक्षक दलाने या घटनेनंतर एक निवदेन जारी केलं आहे. यामध्ये म्हटलं आहे की इंडियन कोस्ट गार्डच्या एका अॅडव्हान्स्ड लाईट हेलिकॉप्टरने अलीकडेच गुजरातमध्ये वादळ आलं तेव्हा ६७ लोकांजा जीव वाचवला होता. तेच हेलिकॉप्टर सोमवारी रात्री ११ वाजता अरबी समुद्रात अडकलेल्या एका जहाजावरील लोकांच्या मदतीसाठी पाठवण्यात आलं होतं. भारतीय झेंडा असलेल्या हरी लीला या जहाजावरील जखमी क्रू मेंबर्सच्या मदतीसाठी हे हेलिकॉप्टर पाठवण्यात आलं होतं. मात्र, पोरबंदर किनाऱ्यापासून ४५ किमी दूर अरबी समुद्रात ते अपघातग्रस्त झालं आहे.

**हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले**

तटरक्षक दलाने त्यांच्या निवेदनात म्हटलं आहे की हेलिकॉप्टरमध्ये चार जण होते. बचाव मोहिमेदरम्यान तातडीने हेलिकॉप्टरचं लॅंडिंग करावं लागलं. हेलिकॉप्टरमधील एका डायव्हरला वाचवण्यात आम्हाला यश मिळालं आहे. उर्वरित तीन जणांचा शोध घेतला जात आहे. तसेच हेलिकॉप्टरचे अवशेषही सापडले आहेत. जिथे हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले त्याच्या आसपास शोधमोहीम सुरू आहे.

## 'लाडक्या बायको'साठी सरकारला फसवलं, ३० अर्ज भरले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३ सातारा**

राज्यभरात सध्या सरकारच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची जोरदार चर्चा सुरु आहे. अनेक महिला याला चांगला प्रतिसाद देत असून या योजनेसाठी अर्ज करत आहेत. मात्र याच योजनेशी संबंधित एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. साताऱ्यात एका व्यक्तीने आपल्या पत्नीच्या नावे ३० अर्ज दाखल करत सरकारची हजारो रुपयांची फसवणूक केली आहे.



खारघरमधील महिला पुजा प्रसाद महामुनी यांच्या आधारकार्डचा गैरवापर झाल्याचे समोर आल्यानंतर पनवेल तहसिल कार्यालयात तक्रार केली असता हा प्रकार समोर आला आहे.

# पश्चिम बंगाल विधानसभेत 'अँटी रेप' विधेयक मंजूर

## नवीन कायद्यात बलात्कार प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षेची तरतूद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३कोलकाता**

पश्चिम बंगाल विधानसभेच्या विशेष अधिवेशनात आज (दि.३) बलात्कार विरोधी ('अपराजिता वुमन अँड चाइल्ड बिल ) विधेयक मंजूर करण्यात आले आहे. नवीन कायद्यात बलात्कार पीडितेचा मृत्यू झाला किंवा तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेले आरोपीस फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. तसेच बलात्कार आणि सामूहिक बलात्कारच्या दोषींना पॅरोलशिवाय जन्मठेप शिक्षा होणार आहे.

'अपराजिता वुमन अँड चाइल्ड बिल (पश्चिम बंगाल गुन्हेगारी कायदे आणि सुधारणा) २०२४' हे विधेयक, बलात्कार आणि लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित नवीन तरतुदी करण्यात आल्या आहेत. नुकत्याच लागू केलेल्या भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ कायदे आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ मध्ये सुधारणा सुचविल्या आहेत. या विधेयकाचा उद्देश राज्यातील महिला आणि मुलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे हा आहे. विशेषत: स्त्रिया आणि मुलांचे मूलभूत अधिकार जपण्याच्या राज्याच्या बांधिलकीचा आणि घृणास्पद कृत्यांना प्रतिबंध करणे हा या कायद्याचा उद्देश असल्याचे राज्य सरकारने म्हटले होते.

**तपास आणि खटला चालवण्याच्या प्रक्रियेतही बदल**


पश्चिम बंगालमधील नवीन कायद्यानुसार, आता बलात्कार प्रकरणी तपास आणि खटला चालवण्याच्या प्रक्रियेतही बदल करण्यात आले आहेत. बलात्कार प्रकरणाचा तपास प्रारंभिक अहवालाच्या २१ दिवसांच्या आत पूर्ण करणे आवश्यक आहे. १५ दिवसांपर्यंत संभाव्य विस्तारासह. नवीन तरतुदींनुसार गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलीस उपअधीक्षकांच्या नेतृत्वाखाली 'अपराजिता टास्क फोर्स' नावाच्या जिल्हा स्तरावर 'स्पेशल टास्क फोर्स' ची स्थापना करण्याचेही या कायद्यात सुचविण्यात आली आहे. पीडितेला जलद न्याय सुनिश्चित करण्यासाठी विशेष न्यायालय आणि तपास पथक स्थापन करण्याचीही तरतूद आहे.

# छत्तीसगडमध्ये चकमकीत नऊ नक्षलवादी ठार

## दंतेवाडा–विजापूर सीमेवरील जंगलात सुरक्षा दलांची धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ दंतेवाडा**

दंतेवाडा-विजापूर सीमेवरील जंगलात झालेल्या चकमकीत नऊ नक्षलवादी ठार झाल्याचे वृत्त '-छख'ने दिले आहे.दंतेवाडा विजापूर सीमेवरील जंगलात नक्षलवाद्यांनी आश्रय घेतला असल्याची गोपनीय माहिती सुरक्षा दलांना मिळाली. आज सकाळी १०:३० वाजता शोधमोहिम राबविण्यात आली. यावेळी नक्षलींनी पोलिस दलाचा पीएलजीए कंपनी क्रमांक ०२ वर गेळीबार केला.



चकमक सुरू झाली. आतापर्यंत ९ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा दलांनी यश आले आहे, अशी माहिती बस्तरचे महानिरीक्षक पी सुंदरराज यांनी दिली. मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. सध्या शोधमोहीम सुरू असून, ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतर सविस्तर माहिती देण्यात येणार असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले आहे.चकमक संपल्यानंतर सविस्तर माहिती मिळेल. या चकमकीत नक्षलवादी मोठ्या संख्येने जखमी झाले आहेत. यांची माहिती सध्या गोळा केली जात आहे. या चकमकीत ठार झालेल्या काही नक्षलवाद्यांचे मृतदेह मिळाले आहेत. तसेच काही हत्यारेही मिळून आली आहेत. याबाबत आधिक माहिती सुरक्षा दलांकडून गोळा केली जात असल्याचे सांगण्यात आले.

पश्चिम बस्तर डिविजनला या भागात नक्षलवादी असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. यानंतर सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले होते. याच दरम्यान नक्षल्यांनी गोळीबाराला सुरुवात केली. यानंतर सुरक्षा दलांनीही जोरदार प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली. अधिकाऱ्यांनी सांगितले की येथील पाच ते सात किलोमीटर जंगलाच्या परिसरात जवळपास ६५ नक्षलवादी लपून बसल्याची शक्यता आहे. याची माहिती मिळाल्यानंतर दंतेवाडा आणि बीजापूर जिल्हा पोलीस आणि सुरक्षा दल यांनी संयुक्तपणे अभियान राबवले. रात्रीच्या वेळी जवान याठिकाणी पोहोचले. त्यानंतर गोळीबाराला सुरुवात झाली.

# अहमदनगरचं 'अहिल्यानगर' होणार; नामांतरास रेल्वे मंत्रालयाचाही ग्रीन सिग्नल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अहमदनगर**

अहमदनगर जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यास केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने हिरवा कंदिल दाखवला आहे. अहिल्यानगर नाव देण्यास विभागाची कोणतीही हरकत नाही असे पत्र दिल्याने जिल्ह्याच्या नामांतराचा मार्ग सुकर झाला आहे, अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. जिल्ह्याला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याची मागणी अनेक दिवसांपासून होती. महायुती सरकारने नागरिकांच्या या मागणीचा सकारात्मक विचार केला. नगर जिल्ह्याचं नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर करण्याचा निर्णय घेण्यात आला.




अहिल्यानगर नामांतराच्या बाबतीतील सर्व प्रक्रीया ही केंद्र सरकारच्या अखत्यारीत होत असल्याने प्रत्येक विभागाची ना हरकत आवश्यक असते. केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने नामांतराच्या बाबतीत हरकत नसल्याचे पत्र जारी केले आहे. अहिल्यानगर नावास मान्यता दिली आहे. या नावाचे कोणतेही रेल्वे स्टेशन देशात नसल्याचेही त्यांनी आपल्या पत्रात नमुद केले आहे. नगर जिल्ह्याला अहिल्यानगर नाव देण्यातील पहिला टप्पा पूर्ण होत असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.मागील अनेक दिवसांपासून अहमदनगरचे नाव अहिल्यानगर नामांतर करावे, अशी मागणी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकरांनी शासन दरबारी केली होती. त्यानंतर अनेक सामाजिक संघटनांकडूनही शासन दरबारी पाठपुरावा करण्यात येत होता. एवढंच नाहीतर अहमदनगरचे नाव अहिल्यानगर व्हावे यासाठी यात्राही काढण्यात आली होती.

# महाराष्ट्रात येत्या ४८ तासांत मुसळधार पाऊस मराठवाडा विदर्भातील अनेक जिल्ह्यांना झोडपणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३पुणे**

सप्टेंबर महिना सुरु होताच राज्यात पाऊस सक्रिय झाला असून सध्या अनेक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. पावसामुळे नदी-नाले तुडूंब भरून वाहत असून पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये मोठा जलसाठा जमा झाला आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस राज्यात पावसाची अशीच स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे.



विदर्भ आणि मराठवाड्याला पावसाचा अलर्ट जारी करण्यात आलाय. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, सध्या पूर्व विदर्भ आणि तेलंगणावर असलेल्या कमी दाबाच्या पट्ट्याची तीव्रता कमी झाली आहे. येत्या ४८ तासांत मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यात तुफान पावसाची शक्यता आहे. तर विदर्भातील बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली तसेच वाशिम जिल्ह्यात जोरदार पावसाचा अंदाज आहे. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# एकनाथ खडसे हे सरपटणारे, रंग बदलणारे... चंद्रकांत पाटलांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३मुक्ताईनगर**

गेल्या काही महिन्यांपूर्वी एकनाथ खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातून पुन्हा एकदा भाजपमध्ये घरवापसी करण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी लोकसभा निवडणुकीपूर्वी एकनाथ खडसे यांनी दिल्लीत जाऊन भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली होती. तसेच, लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवार रक्षा खडसे यांचा प्रचार केला होता. तरीही, अद्याप एकनाथ खडसे हे भाजपमध्ये सामील झाले नाहीत. त्यामुळे एकनाथ खडसे कोणत्या पक्षात आहेत? असा प्रश्न उपस्थित झाला. यावर एकनाथ खडसे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. भाजपमध्ये माझा प्रवेश झाला, पण घोषणा झालेली नाही. काही दिवस वाट पाहीन आणि राष्ट्रवादीमध्ये पुन्हा सक्रिय होईन, असे एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे.



मुक्ताईनगरमधील शिवसेनेचे (शिंदे गट) आमदार चंद्रकांत पाटील यांनी एकनाथ खडसे यांच्या भाजप पक्षप्रवेशावर प्रतिक्रिया देत त्यांच्यावर निशाणा साधला आहे. 'हे रंग बदलणारे सरपटणारे प्राणी आहेत' अशी टीका चंद्रकांत पाटील यांनी एकनाथ खडसेंवर टीका केली. तसेच, एकनाथ खडसेंच कुटुंबच संभ्रमात टाकणारं आहे, आज राष्ट्रवादी आणि उद्या भाजपमध्ये. आधी सुनेला लोकसभेत पोहोचवलं, त्यानंतर आता मुलीसाठी सोयीस्करपणे राजकारण करणारे खडसे आहेत. एकनाथ खडसे हे स्वतःच्या स्वार्थासाठी राजकारण करणारे आहेत. गेल्या ३० वर्षात एकनाथ खडसेंनी कुठलाही विकास मतदारसंघात केला नाही, अशी टीका चंद्रकांत पाटील यांनी केली.

## संपादकीय ......

# दहशत भटक्या कुत्र्यांची

सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट करणारे, रस्त्यामध्ये सुरुंग पेरून त्यांचे स्फोट करणारे असे विविध प्रकारचे दहशतवादी आपण ऐकले आहेत. आपल्या देशाने या दहशतवाद्यांच्या मोठा अनुभव पण घेतलेला आहे. पुण्यासारख्या शहरात कोयता गँग नावाच्या टोळ्यांची पण दहशत आहे. या सर्वांना मागे टाकतील असे दहशतवादी आज महाराष्ट्राच्या सर्व शहरांमध्ये आहेत आणि ते म्हणजे भटके कुत्रे. अमुक एका परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत किंवा भटक्या कुत्र्यांनी चावे घेऊन एखाद्या माणसाला घायाळ केल्याच्या घटना आपण नेहमी वाचत असतो. या भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर आळा घालण्याचे प्रयत्न जरूर केले जात आहेत; पण असे प्रयत्न करणार्या संस्थांना या 'भटक्यां'नी डोके टेकवण्यास भाग पाडले आहे.

घडले असे की, एक गृहस्थ रात्री १२ वाजता रेल्वेने शहरामध्ये पोहोचणार होते. १२ वाजता ते रेल्वे स्टेशन किंवा बस स्टँडवर पोहोचतील तर साधारणत: एक-दीड वाजेपर्यंत ते घरी गेले असते. तसे करण्याऐवजी त्यांनी आज आपण मुक्कामी घरी येणार नसल्याचे फोन करून सांगितले. रात्रीच्या वेळी घरापर्यंत रिक्षा येत नाही. रिक्षावाले जवळच्या चौकात सोडतात आणि तिथून अवघ्या पाव किलोमीटर अंतरावर असलेल्या घरी पोहोचणे या रस्त्यामध्ये जागोजागी असे दहशतवादी भटके कुत्रे बसलेले आहेत. त्यामुळे मी आज लॉजवर मुक्काम करतो आणि उद्या सकाळी घरी येतो, असे त्यांनी सांगितले. असे सांगितल्यानंतर घरची मंडळी अजिबात चकित झाली नाहीत. त्यांच्या मुलाने त्यांना सांगितले की, बाबा, आज मुक्काम तिकडेच करा. उद्या सकाळी मी तुम्हाला घ्यायला येतो. आपले घर जवळ दिसत असूनही न पोहोचू शकण्याचे मुख्य कारण म्हणजे रस्त्यात असणारे भटके कुत्रे.

रात्रीच्या नीरव शांततेच्या वेळी रस्त्यांवर, शहरांमध्ये, गावांमध्ये यांचेच राज्य असते. रात्रीच्या वेळी त्यांच्या टोळ्या सक्रिय होतात, याचे कारण म्हणजे त्या संपूर्ण प्रदेशावर त्यांची सत्ता असते आणि आपल्या प्रदेशाची राखण करणे हे प्रत्येक कुत्र्याचे जन्मजात कर्तव्य असल्यामुळे नेहमीचा माणूस आला तरी पण ती त्याला पळवून लावत असतात. एकटा-दुकटा व्यक्ती बिचारा हातात बॅग घेऊन कसाबसा या कुत्र्यांकडे दुर्लक्ष करत चालतो तेव्हा ते त्याच्यावर हल्ला करतात आणि गडबडून गेलेला माणूस जर खाली पडला, मग तर बघायलाच नको. नसबंदीचे ऑपरेशन केले नाही, तर एक भटकी मादी दर सहा महिन्याला पाच ते सहा पिलांची भर घालत असते. त्यातील दोन-तीन मरतात, तरी किमान तीन तरी जगतातच आणि एका गल्लीमध्ये जर असे चाळीस भटके कुत्रे असतील आणि त्यापैकी वीस माद्या असतील तर किमान साठ कुत्र्यांची भर या टोळीमध्ये दरवर्षी पडत असते. झपाट्याने वाढ होत असल्यामुळे अवघ्या सहा ते आठ महिन्यांमध्ये हे कुत्रे नव्याने हल्ले करण्यास सज्ज होतात. शहरांमधून आणि गावांमधून प्रचंड प्रमाणात उरलेले अन्न फेकले जाते. हे अन्न खाऊन ही कुत्रे धष्टपुष्ट झालेले असतात आणि साहजिकच आपल्या परिसरामध्ये सक्रिय असतात. ज्यांना अन्न मिळत नाही, ते श्वान चिडखोर झालेले असतात आणि त्यामधूनच ते समोर दिसणारी व्यक्ती, प्राणी, वाहनचालक, सायकलवाला, कारवाला यांचा पाठलाग करत असतात. प्रत्येक गावामध्ये या भटक्या कुत्र्यांच्या चाव्यामुळे लस घ्यावी लागणार्या लोकांची संख्या काढली, तर ती लाखामध्ये निघेल.

# शेतकऱ्यांसाठी १४ हजार कोटींचा बूस्टर, बळीराजाच्या उत्पन्नवाढीला मिळेल बळ

## कृषी क्षेत्रासाठी ७ महत्त्वपूर्ण योजनांना मंत्रिमंडळाची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ नवी दिल्ली –** यावर्षी दमदार मान्सून बरसल्यामुळे देशातील शेतकरी सुखावला आहे. आता केंद्र सरकारनेही शेतकऱ्याला खूश करणारी बातमी दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने सुमारे १४ हजार कोटी रुपयांचा बूस्टर कृषी क्षेत्रासाठी जाहीर केला आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी ७ महत्त्वाच्या योजना जाहीर केल्या असून, त्यात डिजिटल कृषी मिशन आणि पीक विज्ञान योजनांचा समावेश केला आहे.



केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ निर्णयाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या आयुष्यात बदल घडविणारे तसेच त्यांचे उत्पन्न वाढविणारे ७ महत्त्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले आहेत. संशोधन आणि शिक्षण, हवामान बदलाचा प्रतिकार, नैसर्गिक स्रोत व्यवस्थापन, कृषी क्षेत्राचे डिजिटायझेशन तसेच फलोत्पादन आणि पशुधन विकासावर या योजना केंद्रित आहेत.

**पीक विज्ञान**

पीक विज्ञानामध्ये सहा प्रमुख स्तंभ बळकट करण्यावर भर दिला आहे. संशोधन व शिक्षण, वनस्पती जनुकीय संसाधन व्यवस्थापन, अन्न व पिकांसाठी जनुकीय सुधारणा, डाळी व तेलबियांच्या पिकात सुधारणा, व्यावसायिक पिकांमध्ये सुधारणा तसेच कीटक, सूक्ष्मजीव, परागकण यावर संशोधन हे सहा स्तंभ बळकट करण्यात येणार आहेत. यासाठी ३,९७९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

**डिजिटल कृषी मिशन**

या योजनेसाठी २,८१७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यातून शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित विविध माहिती उपलब्ध होईल.

**कृषी क्षेत्रात 'एआय'**

एआय, डिजिटल डीपीआय, रिमोट इत्यादींचा वापर करून कृषी शिक्षण, व्यवस्थापन व समाज विज्ञान बळकट करण्यात येणार आहे. त्यात हवामान बदलाच्या प्रतिकाराचाही समावेश आहे. यासाठी २,२९१ कोटी मंजूर केले आहेत.

**इतर महत्त्वाच्या योजना**

१,७०२
कोटींची तरतूद पशूधन आरोग्य योजनेसाठी.

१,२०२
कोटी रुपयांची तरतूद कृषी विज्ञान केंद्रांसाठी

१,११५
कोटींची तरतूद नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन योजनेसाठी

८६०
कोटी रुपयांची तरतूद फळबागांच्या विकासासाठी.

## आज होणारी प्रथम कुलगुरू डॉ. के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला रद्द

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.३ अमरावती.** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने प्रथम कुलगुरू डॉ. के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला कार्यक्रम दि. ३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता जवाहरलाल दर्डा इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी लोहारा, यवतमाळ येथे आयोजित केला होता.

परंतु काही अपरिहार्य कारणामुळे सदर व्याख्यान कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला असून पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. कृपया सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. तत्ववादी यांनी कळविले आहे.

# विद्राव्य खतांच्या ग्रेड किती? कोणत्या ग्रेडमध्ये कोणती अन्नद्रव्ये.. वाचा सविस्तर

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

विद्राव्य खते ही पाण्यात पुर्णपणे विरघळणारी असतात. त्यामुळे ही खते पिकांना फवारणीद्वारे किंवा ठिबकद्वारे देणे संयुक्तिक आहे. ही खते पिकांना लवकर उपलब्ध होतात. ही खते पिकांच्या वाढीच्या अवस्थेत देण्याकरीता अधिक फायदेशीर आहेत.

विद्राव्य खते फवारणीद्वारे देत असताना स्टीकर्स वापरणे फायद्याचे असते. बाजारामध्ये वेगवेगळी खतांची ग्रेड उपलब्ध आहेत. त्या-त्या अवस्थेमध्ये ती ग्रेड फवारल्यास उत्पादनामध्ये वाढ दिसून येते. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार वेगवेगळी खतांच्या ग्रेडची निवड करून त्यांची पिकांवर फवारणी करावी.

बाजारामध्ये उपलब्ध असलेले विविध ग्रेडचे विद्राव्य खते

**१)१९:१९:१९/२०:२०:००**

यामध्ये नत्र, स्फुरद व पालाश ही अन्नद्रव्ये समप्रमाणात आहेत. या ग्रेडला स्टार्टर ग्रेड असेही म्हणतात. यातील नत्र हा अमाईड, अमोनिअम/अमोनिकल व नायट्रेट या तिन्ही स्वरूपात असतो. या खताचा प्रामुख्याने पीक वाढीच्या सुरूवातीच्या अवस्थेत शाखीय वाढीसाठी उपयोग होतो.

**२) १२:६१:००**

याला मोनो अमोनिअम फॉस्फेट म्हणतात. यामध्ये अमोनिकल नत्र कमी (१२%) असून पाण्यात विरघळणाऱ्या स्फुरदाचे (६१%) प्रमाण जास्त असते. नवीन मुळांच्या तसेच (जोमदार शाकीय वाढीसाठी) फळ-फांद्यांच्या वाढीसाठी तसेच फुलांच्या योग्य वाढीसाठी व पुनरूत्पादनासाठी या खताचा उपयोग होतो.

**३) ००:५२:३४**

या खतास मोनो पोटॅशिअम फॉस्फेट म्हणतात. यात स्फुरद व पालाश ही अन्नद्रव्ये आहेत. फुले लागण्यापूर्वी व लागल्यानंतरच्या कालावधीसाठी हे खत उपयुक्त आहे. पिकामध्ये बोंडे, शेंगा, फळांची योग्य पक्वता व सालीच्या आकर्षक रंगासाठी हे खत विशेषत्वाने वापरले जाते




**४) १३:०:४५**

या खतास पोटॅशिअम नायट्रेट म्हणतात. यात नत्राचे प्रमाण कमी असून पाण्यात विद्राव्य पालाशचे प्रमाण जास्त असते. फुलोऱ्यानंतरच्या अवस्थेत व पक्वता अवस्थेत या खताची आवश्यकता असते. अन्न निर्मिती व त्याच्या वहनासाठी हे खत उपयोगी आहे. या खतामुळे पीक अवर्षणप्रवण स्थितीत तग धरते.

**५) ००:००:५०:१८**

या खतास पोटॅशिअम सल्फेट म्हणतात. या खतामध्ये पालाश बरोबर उपलब्ध स्वरूपातील गंधक असतो. पक्वतेच्या अवस्थेत हे खत उपयोगी पडते. हे खत फवारले असता भुरी सारख्या रोगाचे ही नियंत्रण होऊ शकते. या खतामध्ये पालाश आणि गंधक असल्यामुळे मुळे पीक अवर्षणप्रवण स्थितीत तग धरू शकते आणि गळीत धान्य पिकांसाठी फायदेशीर आहे.

**६) १३:४०: १३**

पात्या, फुले लागण्याच्या वेळी या खताची फवारणी केल्यास फुलगळ थांबून कपाशीची बोंडे वा अन्य पिकांत शेंगाची संख्या वाढते.

**७) कॅल्शियम नायट्रेट (Calcium Nitrate)**

मुळांची वाढ होण्यासाठी तसेच पीक काटक होण्याच्या दृष्टीने वाढीच्या सुरूवातीच्या काळात व बोंडे किंवा शेंगावाढीच्या अवस्थेत या खताचा वापर होतो.

**८) २४:२४:००**

यातील नत्र हा नायट्रेट व अमोनिकल स्वरूपातील आहे. शाखीय वाढीच्या तसेच फुलधारणा अवस्थेत त्याचा वापर करता येतो.

**विद्राव्य खतांचा वापर करताना**

- विद्राव्य खतांचा वापर करीत असतांना आणि त्यांची मात्रा काढत असतांना, माती परीक्षण हा महत्वाचा मुद्दा आहे.

- खत मात्रा ठरविण्यासाठी मातीची गुणधर्मेही माहित असणे आवश्यक आहे, अन्यथा खतांवरील खर्च वाढण्याची शक्यता असते.

- माती परीक्षण अहवालातील सहा स्तरीय वर्गीकरणानुसार अथवा विविध पिकांकरीता विकसीत केलेल्या गुणसुत्रांनुसार आणि सिंचनाच्या पाळ्या नुसार मात्रा ठरवावी.

- सहसा विद्राव्य खतांचा वापर करीत असतांना ३-४ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात विविध ग्रेडचा वापर केल्या जातो, काही वेळा ७-८ ग्रॅम प्रति लिटर खत वापर सांगितल्या गेला आहे. म्हणजेच १० लिटर च्या टाकी साठी ७०-१०० ग्रॅम खत वापरणे गरजेचे आहे.




## आजकाल लहान मुलांमधे वाढतोय मायग्रेनचा धोका

**दि.३विदर्भ प्रजासत्ताक**

आजकाल मायग्रेनची समस्या केवळ ज्येष्ठांत किंवा प्रौढ व्यक्तींपर्यंतच मर्यादित राहत नसल्याचे दिसून येत आहे. हा त्रास आता मुलांनादेखील होत आहे. शाळेत जाणाऱ्या एकूण मुलांपैकी दहा टक्के मुलांना या विकाराचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे निम्म्याहून अधिक मुलांना १२ वर्षांच्या अगोदरच मायग्रेनचा अ‍ॅटॅक सहन करावा लागतो.



मायग्रेन हा एक मेंदूशी निगडित आजार आहे. त्याच्या लक्षणात डोकेदुखी, उलटी येणे, चक्कर येणे, मूड बदलणे, प्रकाश किंवा आबाजाबाबत संवेदनशील होणे आदींचा समावेश आहे. मुलांत हा ज्येष्ठाप्रमाणे दीर्घकाळ राहत नाही. परंतु, मुलांचे सामान्य जीवन विस्कळीत करण्याचे काम मायग्रेन करते.

अधिक काळ टीव्ही पाहणे: या आजाराचे विविध प्रकार असून, त्यापैकी एक क्रॉनिक डेली मायग्रेनचा समावेश आहे. या प्रकारात मुलांना एका दिवसात चार ते पाच तास डोकेदुखीचा त्रास राहतो. डोकेदुखीशिवाय ट्रिगर मायग्रेनचे अन्य काही कारणे आहेत. बोलण्याच्या शैलीत बदल होणे, शरीरात पाण्याची कमतरता जाणवणे, जंक फूडचे अधिक सेवन, दीर्घकाळ टीव्ही किंवा संगणकासमोर बसणे या कारणांमुळेही मायग्रेनचा त्रास बळावतो

**अशी होते तपासणी:** कुटुंबात एखाद्याला मायग्रेनचा त्रास असेल, तर मुलांना देखील त्याचा त्रास होण्याची शक्यता बळावते. अशावेळी पालकांनी – मुलांच्या डोकेदुखीकडे दुर्लक्ष करू नये आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार रक्त तपासणी, ईईजी, लंबर पंचर, न्यूरोइमेजिंग टेस्ट आदी चाचणीच्या आधारे आजाराचे कारण तपासून घ्यावे.

**उपचार कसे होतात?** मायग्रेनवर तीन मार्गांनी उपचार केले जातात. यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी केलेले नियोजन, मुलींत मायग्रेनचा हल्ला हा मासिक पाळीशी निगडित असतो. साधारणपणे तीन प्रकारे मायग्रेनवर उपचार केले जातात. सर्वात अगोदर म्हणजे अ‍ॅक्यूट उपचार, म्हणजे त्यात लक्षणांनुसार औषधे दिली जातात. दुसरे म्हणजे प्रतिबंधात्मक उपचार असून, त्यात मायग्रेन अ‍ॅटॅकची संख्या कमी केली जाते, तिसरे म्हणजे पूरक उपचार पद्धती. यात औषधाचा वापर केला जात नाही; पण अ‍ॅक्यूपंक्चर, व्यायाम, उचित आराम आणि आहाराच्या माध्यमातून मायग्रेन नियंत्रित करण्यात येते.

# शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी: कापूस-सोयाबीन उत्पादकांना या तारखेपासून होणार अर्थसहाय्य वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ मुंबई:** राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला असून सन २०२३ खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ४ हजार १९४ कोटी रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलं आहे. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या अर्थसहाय्य वाटपात येणाऱ्या तांत्रिक अडचणी या महाआयटी व महसूल विभागाच्या सहाय्याने तत्काळ सोडवून शेतकऱ्यांना येत्या १० सप्टेंबरपासून अर्थसहाय्य थेट खात्यात वितरित करण्याचे निर्देश कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत.

सन २०२३खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य वाटपात येणाऱ्या अडचणींबाबत आढावा बैठक धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती. कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रविंद्र बिनवडे, कृषी संचालक विजयकुमार आवटे, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अधिकारी आणि कृषी विभागाचे संबंधित अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



यावेळी धनंजय मुंडे म्हणाले की, सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १००० रुपये तर ०.२ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रुपये पाच हजार (दोन हेक्टरच्या मर्यादेत) अर्थ सहाय्य मंजूर करण्यात आलं आहे. यामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी १ हजार५४८.३४ कोटी रुपये, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २ हजार ६४६.३४ कोटी रुपये असे एकूण ४ हजार १६४.६८ कोटी रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. खरीप हंगाम २०२३ च्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मंजूर अर्थ सहाय्य देण्याबाबतची कार्यपद्धती ३० ऑगस्ट २०२४ रोजी शासनाने जाहीर केली आहे.

दरम्यान, धनंजय मुंडे यांनी २०२३ सालच्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान देण्याची घोषणा केली होती; त्यानुसार नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पात यासाठी निधीची तरतूद करण्यात आली असून आता येत्या १० तारखेपासून शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट निधी वर्ग करण्यास सुरुवात होणार आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ३ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियान (पीएम-जनमन) अंतर्गत विभागाचा आढावा



## ‘पीएम जनमन अभियाना’ची विभागात प्रभावी अंमलबजावणी करा - विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३ अमरावती**, देशातील केंद्र शासीत प्रदेशासह राज्यातील अतिदुर्गम भागात जंगलाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी समूह व आदिम जमातींच्या नागरिकांना मुलभूत व वैयक्तिक सुविधा पुरविण्यासाठी ‘प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान’ योजना सुरु करण्यात आली आहे. आदिवासी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी या योजनेची विभागात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी संबंधित विभाग व जिल्हा प्रशासनाला आज दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत पीएम जनमन योजनेंतर्गत येणाऱ्या महत्वपूर्ण बाबी व विकासकामांचा आढावा डॉ. पाण्डेय यांनी आदिवासी विकास विभागाकडून घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. आदिवासी विकास अपर आयुक्त जितेंद्र चौधरी, उपायुक्त (महसूल) संजय पवार, उपायुक्त (योजना) राजीव फडके, वरिष्ठ संशोधन अधिकारी प्रिती तेलखडे यावेळी उपस्थित होते.

डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाची सुरुवात झारखंड राज्यातील खुंटी जिल्ह्यात १५ नोव्हेंबर २०२३ रोजी, जनजातीय गौरव दिनी प्रधानमंत्री महोदयांच्या हस्ते झाली. राज्यातील दुर्मीळ व अतीमागास असलेल्या आदिवासी समूह व आदिम जमातींच्या नागरिकांना पायाभूत व वैयक्तिक सुविधा पुरवून त्यांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नती करणे, त्यांना आरोग्य विषयक सर्व सुविधा पुरविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने सुमारे २४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. देशातील केंद्र व राज्य शासित प्रदेशासह १८ राज्यातील ७५ आदिम जमातींचा सर्वांगिण विकासाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी ९ मंत्रालयांकडून ११ प्राधान्य क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. या योजनेबाबत आदिवासी समाजातील शेवटच्या घटकाला माहिती व्हावी, यासाठी विभागातील सर्व जिल्ह्यांत योजनेची व्यापक जनजागृती करण्यात यावी. तसेच आदिवासी समाजातील गरीब, गरजू आदिम जमातींच्या लोकांपर्यंत ही योजना पोहोचवून योजनेंतर्गत संबंधितांना विविध लाभ मिळवून द्यावेत, असे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की, जिल्हा प्रशासनाकडून आदिम जमातींच्या नागरिकांना विविध प्रमाणपत्रे वितरीत करण्यात येतात, परंतू दरवेळी वेगवेगळी आकडेवारी आयुक्तालयास सादर करण्यात येते. जिल्हा प्रशासनाने याबाबत उचित दखल घेऊन, यासंबंधी सर्व यंत्रणांचा आढावा घेऊन वितरीत प्रमाणपत्रांची अचूक संख्या शासनास व आयुक्तालयास कळवावी. पीएम जनमन अभियानांतर्गत विविध सेवा-सुविधा पुरविणाऱ्या विभागांनी उत्तम समन्वयासाठी विभागनिहाय नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. आगामी काळात देशपातळीवर पीएम जनमन अभियानांतर्गत 'मेगा इव्हेंट' साजरा करण्यात येणार आहे. यानुषंगाने स्थळ निश्चितीबाबत पालकमंत्र्यांची मंजूरी घ्यावी. तसेच अभियानांतर्गत राबविण्यात विविध उपक्रम, शिबिरे यासंबधी व्यापक जनजागृती करावी. अमरावती व यवतमाळ जिल्हा प्रशासनाने योजनेच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा, तसेच ती यशस्वी होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी यावेळी दिल्या.

अमरावती विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत अमरावती जिल्ह्यातील धारणी, यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा व पुसद तसेच नांदेड जिल्ह्यातील किनवट या प्रकल्पांतर्गत कोलाम या आदिम जमातीचे वास्तव्य असून २८ हजार ५५६ कुटुंब व १ लाख २४ हजार ४९० एवढी लोकसंख्या आहे. या प्रकल्पांतर्गत पांढरकवडा तालुक्यात ६३१, पुसद तालुक्यात ३४, किनवटमध्ये २५ तर धारणी ३ याप्रमाणे एकुण ६९३ आदिम गावांची संख्या आहे. या अभियानांतर्गत समाविष्ठ असलेल्या नऊ विभागाकडून आदिम जमातीच्या लोकांना तसेच गावांना आरोग्य सुविधा, जोडरस्ते, पक्की घरे, शुध्द जलसाठी पाणी पुरवठा, अंगणवाडी केंद्र, विद्युत पुरवठा, मोबाईल कनेक्टीव्हिटी, बहुउद्देशीय केंद्र इत्यादी सामुहिक स्वरुपाच्या सुविधा उपलब्ध दिल्या जाणार आहे. तसेच शासनाकडून दिली जाणारी रेशन कार्ड, जातीचा दाखला, आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, जनधन कार्ड, आयुष्मान कार्ड, किसान क्रेडीट कार्ड इत्यादी विविध प्रमाणपत्रे तात्काळ वितरीत करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या पीव्हीटीजी मोहिमेंतर्गत कोलाम गाव, पाड्यांचा सर्व्हे करण्यात येत असून त्यासंदर्भात माहिती संकलित करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत वनधन केंद्र मंजूरी, विविध प्रमाणपत्रे व कार्ड, विविध उपक्रम, पायाभूत सुविधांची बांधकामे, आरोग्य केंद्र, अंगणवाडी, शाळा यासंबंधीची एकूण संख्या व सद्यस्थिती आगामी काळात देशपातळीवर पीएम जनमन अभियानांतर्गत 'मेगा इव्हेंट' साजरा करण्यात येणार आहे. यानुषंगाने स्थळ निश्चितीबाबत पालकमंत्र्यांची मंजूरी घ्यावी. तसेच अभियानांतर्गत राबविण्यात विविध उपक्रम, शिबिरे यासंबधी व्यापक जनजागृती करावी. अमरावती व यवतमाळ जिल्हा प्रशासनाने योजनेच्या अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा, आदींबाबत अपर आयुक्त श्री. चौधरी यांनी बैठकीत सविस्तर माहिती दिली व त्यानुषंगाने चर्चा करण्यात आली.

## आमदार देवेंद्र भुयार यांच्या उपस्थितीत गव्हानकुंड येथे शेतकाऱ्यांसोबत पोळा साजरा!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ वरुड** मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी गव्हाणकुंड येथे स्वतः बैलांची सजावट व पूजन करून शेतकऱ्यांना बैलपोळ्याच्या शुभेच्छा दिल्या. आपल्या कृषी संस्कृतीत बैलपोळा सणाचे मोठे महत्त्व आहे. शेतीला आधुनिकता प्राप्त होत असतानाही बळीराजाचे बैलांसोबत पूर्वापार चालत आलेले अनोखे नाते कधीही लुप्त होणार नाही. शेतकरी व बैल यांच्यातील हा स्नेहांकीत बंध असाच कायम राहणार असल्याचे प्रतिपादन आमदार देवेंद्र भुयार यांनी येवेळी केले.शेतकर्यांचा सच्चा साथी म्हणून ओळखल्या जाणार्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोळा सण गव्हाण कुंड येथे आमदार देवेंद्र भुयार यांच्या उपस्थितीत हर्षोल्लासात साजरा करण्यात आला. या सणासाठी गव्हांनकुंड येथे आमदार देवेंद्र भुयार स्वतः उपस्थित राहून शेतकाऱ्यांसोबत बैलांची सजावट करून पूजन केल्यामुळे शेतकर्यांमध्ये कमालीचा उत्साह दिसून आला. गव्हांनकुंड येथे पोळ्यामध्ये आमदार देवेंद्र भुयार यांनी स्वतः बैलांचा साजशृंगार करून बैलांच्या पाठीवर सुरेख नक्षीकाम केलेली झूल, गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, मटाट्या, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा, पायात चांदीचे वा करदोड्याचे तोडे आदी साहित्य लावून शेतकाऱ्यांसोबत बैलांची सजावट करून बैल सजविल्यामुळे गावकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण बघायला मिळाले. शेतकऱ्यांची उपजिविका असलेल्या बैलांचा योग्य मान, सन्मान या सणानिमित्य गव्हाण कुंड येथे बैलपोळा उत्साहात साजरा होतो. बैल हा शेतकऱ्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्राणी आहे, त्याच्यावरच आमची उपजिविका आहे, म्हणून पोळ्याच्या दिवशी बैल जोडीचा योग्य सन्मान करून आमदार देवेंद्र भुयार यांच्या उपस्थितीत पोळा सन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी गव्हाणकुंड येथील शेतकरी उपस्थित होते.-

## शिवसेनेच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

### माजी आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ यांनी मतदार संघात जनसंपर्क वाढविला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अंजनगाव सुर्जी**
विधानसभा निवडणुकीच्या अनुसंघाने शिवसेनेचे (शिंदे गट) उमेदवार म्हणून माजी आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ यांनी मतदार संघात जनसंपर्क मोठ्या प्रमाणात वाढवला असून गेल्या काही महिन्यांपासून अंजनगाव व दर्यापूर या दोन शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात शिवसेना शाखेच्या नव निर्माणासह कार्यक्रमांचा मोठा जल्लोष सुरू केला आहे यातील एक भाग म्हणून येथील नवीन बस स्थानक परिसरात रविवारी (ता.०१) शिवसेनेच्या जन संपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन कॅप्टन अभिजित अडसूळ यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी फटाक्यांची मोठी आतिषबाजी करण्यात आली पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होतेगेल्या काही महिन्यांपासून विधानसभा निवडणुकीचा रंगारंग कार्यक्रम मतदार संघात सुरू झाला असून महायुती व महाविकास आघाडी यात तिकिटासाठी इश्चुकांनी मोठी धडपळ सुरू केली आहे शिवसेनेचे (शिंदे गट) उमेदवार म्हणून माजी आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ हे जनसंपर्क वाढविण्यात अग्रस्थानी असल्याने हा मतदार संघ शिवसेनेच्या वाट्याला जाणार असल्याची खात्री लोकांना वाटत आहे गेल्या काही महिन्यात ठिकठिकाणी शाखांची नव निर्मितीसह कार्यक्रमांचा धडाका वाढला आहे काही दिवसापूर्वी



अभिजित अडसूळ यांनी आपल्या दिवंगत आईच्या स्मुतीप्रित्यार्थ शहराला एक रुग्णवाहिका सुद्धा भेट दिली आणि त्याद्वारे रुग्णसेवा सुद्धा सुरू झाली शहरासह तालुक्यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून शहरप्रमुख मुन्ना इसोकार यांचा मोठा वाटा या पक्ष संघटन वाढीत असल्याचे बोलले जाते नागरिकांना थेट संपर्क करता यावा या सुविधेसाठी येथील नवीन बस स्थानक परिसरात रविवारी (ता.०१) शिवसेनेच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन कॅप्टन अभिजित अडसूळ यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी संपर्क प्रमुख गजानन वाकोडे,जिल्हा प्रमुख गोपाल अरबट, तालुका प्रमुख नितीन चौखंडे,,शहर प्रमुख मुन्ना इसोकार,रवी गणोरकर,नंदू जांभूळकर, अरूणा इंगोले,मीनाक्षी कपले,राजू टिंगणे,प्रितेश अवघड,रामकृष्ण वानखडे, मनोज मंडवे,सुधाकर फुलंबरकर,प्रवीण मालगे,संतोष धर्मे,गजानन पाटील,नितीन देवगिरे, आयुष गिरी,संजय देशमुख,सचिन लुटे,अमोल कान्हेरकर,विनोद पायघन, पवन मंडवे, आकाश मोगरे,मयूर अंधारे,चेतन मोरे,अभी मोरे,अमर मुरकुटे यांच्यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.-

## नागपूर-पुणे-नागपूर सुपरफास्ट ट्रेनचे वेळापत्रक रेल्वेने बदलविले

### ८ ऐवजी १४ फेऱ्या प्रवाशांना मिळणार दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती-** दसरा आणि दिवाळीच्या सणासुदीच्या दिवसात नागपूर-पुणे- नागपूर मार्गावर द्वि-साप्ताहिक एसी सुपर फास्ट स्पेशल ट्रेनच्या ८ फेऱ्या चालविण्याचा निर्णय मध्य रेल्वे प्रशासनाने बदलविला. आता ८ नव्हे तर १४ फेऱ्या चालविल्या जाणार असल्याचे प्रशासनाने सोमवारी स्पष्ट केले आहे.

गणेशोत्सवाला लगेच सुरुवात होणार त्यानंतर लगेच नवरात्र, दसरा, दिवाळीची धूम आहे. नागपूर-पुणे रेल्वे मार्गावर बारा महिने प्रवाशांची गर्दी असते आणि सणोत्सवाच्या दिवसांत त्यात आणखी भर पडते, ते ध्यानात घेऊन मध्य रेल्वेने २८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबरदरम्यान नागपूर ते पुणे आणि पुणे ते नागपूर सुपर फास्ट एसी स्पेशल ट्रेन (एकूण ८



फेऱ्या) चालविण्याचा निर्णय घेतला होता. दोनच दिवसांत हा निर्णय बदलवून या गाड्या आता २१ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर २०२४ दरम्यान (एकूण १४ फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

नागपूरहून प्रत्येक सोमवारी आणि गुरुवारी रात्री ७:४० वाजता ती नागपूर रेल्वे स्थानकावरून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ११:२५ वाजता पुण्याला पोहोचणार असून गाडी नंबर ०१२०२ पुणे नागपूर सुपरफास्ट ही गाडी दर मंगळवारी आणि शनिवारी दुपारी ३:५० वाजता पुण्याहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ६:३० वाजता नागपुरात पोहोचणार आहे. दरम्यान, मध्य रेल्वेने या दोन गाड्यांच्या ८ ऐवजी १४ फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेतल्यामुळे प्रवाशांना चांगला दिलासा मिळणार आहे.

## विलोभनीय कडी असणारा ‘शनी’ ८ ला पृथ्वीच्या जवळ

### खगोलीय घटना : प्रतियूतीमध्ये पृथ्वी-शनी यांच्यातील अंतर कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती** - सूर्यमालेतील सर्वात सुंदर विलोभनीय रिंग असणारा शनी ग्रह ८ सप्टेंबरला पृथ्वीच्या अगदी जवळ राहील. या घटनेला खगोलशास्त्रात प्रतियुती म्हणतात. प्रतियुतीच्या दरम्यान पृथ्वी-शनी यांच्यातील सरासरी अंतर कमी असते.

त्यामुळे या काळात शनीची सुंदर रिंग चांगल्या प्रकारे दिसू शकते. ही रिंग साध्या डोळ्यांनी दिसू शकत नाही. याकरिता टेलिस्कोपची आवश्यकता असल्याचे खगोल अभ्यासकांनी सांगितले.

पृथ्वी ज्या वेळी शनीच्या विषववृत्त पातळीत असते. अशा वेळी शनीचे कडे पृथ्वीवरून चांगल्या प्रकारे दिसू शकत नाही. शनीचा अभ्यास करणारे महिले मानवरहित यान ‘कॅसिनी’ हे आहे. व्हायेजर या मानवरहित यानानेसुद्धा शनीचे जवळून छायाचित्र घेतले आहे. ८ सप्टेंबरला सूर्य मावळल्यानंतर लगेच हा ग्रह पूर्व क्षितिजावर उगवेल आणि पश्चिमेला मावळेल, हा ग्रह रात्रभर आकाशात दिसेल.

हा ग्रह काळसर व पिंगट रंगाचा अगदी चमकदार असल्याने सहज ओळखता येईल. परंतु या ग्रहाची प्रसिद्ध रिंग साध्या डोळ्यांनी दिसू शकणार नाही. याकरिता टेलिस्कोपची आवश्यकता आहे. हा ग्रह पृथ्वीच्या जवळ आल्याने मानवी जीवनावर कोणताही परिणाम होणार नाही. याआधी २७ ऑगस्ट २०२३ रोजी शनी ग्रह पृथ्वीच्या जवळ आला होता, अशी मराठी विज्ञान परिषदेचे अमरावती विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली.



### शनीला ८२ चंद्र, सर्वात मोठा टायटन

शनीला एकूण ८२ चंद्र असून सर्वात मोठा चंद्र टायटन आहे. या ग्रहाला सूर्याभोवती एक चक्कर मारण्यास २९.५ वर्षे लागतात. या ग्रहाचा व्यास १.२० लाख किमी आहे. तापमान शून्याखाली १८० अंश सेंटिग्रेड आहे. या ग्रहाची घनता सर्वात कमी आहे. शनीची रिंग ही बर्फाची आहे. शनीचे वस्तुमान पृथ्वीच्या ९५ पट असल्याचे गिरुळकर यांनी सांगितले.

# उद्या तिवसा येथे महिलांच्या भव्य बैलपोळ्याचे आयोजन

## आ.यशोमती ठाकूर यांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** बैलपोळा हा पारंपरिक सण महाराष्ट्रात विशेषता विदर्भात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. बैलपोळ्याच्या सणानिमित्त बैलांचे पूजन केले जाते. यावेळी अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथे महिलांच्या बैलपोळ्याचे आयोजन करण्यात आले असून यासाठी विविध आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली असल्याची माहिती तिवसा मतदार संघाच्या आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी दिली आहे.

बैलपोळा हा सण राज्यभरात मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला जातो. या सणानिमित्त वर्षभर शेतात काबाडकष्ट करणाऱ्या बैलांची मनोभावे पूजा केली जाते. त्यांना विविध अलंकारांनी सजवले जाते. मात्र, बैलपोळ्याच्या या सणाला अधिक आकर्षक आणि भव्य स्वरूप देण्यासाठी तसेच सामाजिक संदेश देण्यासाठी भव्य बैलपोळा आयोजित करण्यात आला आहे. या बैलपोळ्याच्या माध्यमातून प्रथम येणाऱ्या बैल जोडीला २५ हजार रुपयांचे बक्षीस द्वितीय बैल जोडीला १५००० रुपयांचे तृतीय बैल जोडीला ११००० तर चतुर्थ बैल जोडीला सात हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे ,अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी सामाजिक संदेश देणाऱ्या बैल जोड्यांना ५००० रुपये आणि स्मृतिचिन्ह प्रोत्साहन पर बक्षीस म्हणून दिले जाणार आहे. यामध्ये उत्कृष्ट सामाजिक संदेश देणारी





बैलजोडी, लोकशाही आणि संविधान वाचवा संदेश देणारी बैलजोडी, वाढती बेरोजगारी संदेश देणारी बैल जोडी, वाढते महिला अत्याचार बाबत संदेश देणारी बैल जोडी, सरकारच्या चुकीच्या ध्येयधोरणांचा संदेश देणारी बैल जोडी, शेतकऱ्यांना सरकारकडून अपेक्षित असलेल्या मागण्यांचा संदेश देणारी बैल जोडी, राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारी बैल जोडी, देशाच्या जडणघडणीत काँग्रेसच्या असलेला सहभाग संदेश देणारी बैलजोडी शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव नसल्याच्या व्यथा सांगणारी बैल जोडी अशा बैल जोड्यांनाही प्रोत्साहन पर बक्षीस हे दिली जाणारा सून सहभागी होणाऱ्या प्रत्येक बैल जोडीला अडीच हजार रुपये प्रोत्साहन पर बक्षीस आणि स्मृतिचिन्ह ही देण्यात येणार आहे. यावेळी शेतकऱ्यांकडून विविध मागण्या या बैलपोळ्या निमित्त केल्या जाणारा असून ट्रॅक्टरला सबसिडी देण्यात येते तर बैल जोडीला ही सबसिडी मिळाली पाहिजे, पेरणी ते कापणी ही सर्व कामे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत समाविष्ट करावीत, महिला शेतकरी नावाचा गट तयार करून महिलेला मशागतीसाठी बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून द्यावे, तसेच एकल महिलांना शेती करण्यासाठी एकही वीस हजार रुपये अनुदान द्यावे, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात येणार असून यावेळी संस्कृती आणि परंपरा जपणाऱ्या शेतकरी आणि महिला शेतकऱ्यांचा सन्मानही करण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे आणि आमदार ड. यशोमती ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा ४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता तिवसा येथील देवराव दादा हायस्कूल चा प्रांगणात होणार असल्याची माहिती तिवसा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सतीश भाऊ पारधी यांनी दिली आहे. या बैलपोळ्याचे आयोजन तिवसा शहर महिला काँग्रेस समिती, तिवसा काँग्रेस समिती, शहर काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस कमिटी आणि एनएसयुआय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### समादेशक एम. राकेश कलासागर भापोसे यांच्या हस्ते

# डॉ. राजकुमार दासरवाड यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती–** राज्य राखीव पोलीस गट गट क्र. ९ अमरावती यांच्यातर्फे आयोजित कार्यक्रमात दिनांक ३० ऑगष्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता समादेशक मा. एम. राकेश कलासागर (भापोसे) यांच्या हस्ते डॉ. राजकुमार दासरवाड यांना प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष समादेशक मा. एम. राकेश कलासागर भापोसे हे होते तर कार्यक्रमाला विशेष उपस्थिती पोलिस उपअधीक्षक श्री. किशन येरमुरे, पोलिस उपअधीक्षक श्री. कराळे साहेब, पोलिस उपअधीक्षक श्री. रोटे साहेब यांची उपस्थिती होती. पोलीस निरीक्षक रावसाहेब शिंदे साहेब, पोलीस उपनिरीक्षक श्री. यादव तांबोळी





यांच्यासह सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची विशेष उपस्थिती होती. प्रा. डॉ. राजकुमार दासरवाड यांनी संवाद कौशल्य व गट चर्चा या दोन विषयावर मार्गदर्शन करून उल्लेखनीय व कौतुकास्पद कार्य राहिलेला आहे. तसेचं आपलं ज्ञान आमच्या कर्मचाऱ्यांना नावीन्यपूर्ण मार्गदर्शन मोलाचं राहिलेलं आहे असे त्यांच्या कार्याचे कौतुक एम. राकेश कलासागर यांनी केले. तसेचं सर्व अधिकारी आणि पदाधिकारी यांनी देखील शुभेच्छा दिल्या. आयोजन व सूत्रसंचालणं पाउपनिरीक्षक कृष्णा हेंगाडे यांनी तर आभार पोलीस उपनिरीक्षक श्री. राजेंद्र चोरपगार साहेब यांनी केले .

# आरटीईच्या रिक्त जागांवरील प्रवेशासाठी आणखी एक संधी

## प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी तिसरी फेरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी आता तिसरी फेरी राबवली जाणार आहे. या प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत ७३ हजार ६१२ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून अद्याप ३१ हजारांहून अधिक जागा रिक्त आहेत.राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २४२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी सुरुवातीला दाखल झालेल्या २ लाख ४२ हजार ५१६ अर्जांतून ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला होता. त्यानंतर प्रतीक्षा यादीत ७१ हजार २७६ विद्यार्थ्यांचा समावेश होता. सुरुवातीला २३ ते ३१ जुलै या कालावधीत प्रवेश फेरी पूर्ण झाल्यानंतर त्याला आणखी दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली होती.





# विषय पदवीधर शिक्षकांना भेदभाव न करता पदवीधर वेतनश्रेणी लावा

## प्राथमिक शिक्षक समितीचे मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन

## ५ सप्टेंबर २०२४ राज्यव्यापी धरणे आंदोलना शिक्षक समितीचा पाठींबा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती –**

राज्यातील उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) वर्गावर अर्हताधारक पदवीधर शिक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम–२००९ अंमलात येण्यापूर्वी इयत्ता ५वी ते ७ वीला अध्यापन करण्यासाठी शिक्षण, रोजगार व युवक सेवा विभाग, शासन निर्णय क्र. पीटीपी १०७७/१४६९३ (१५०२) सात. दि. १४ नोव्हेंबर १९७९नुसार एक पदवीधर शिक्षक आणि तीन सहाय्यक शिक्षक अशी चार पदे अनुज्ञेय होती. एकूण मान्य असणाऱ्या चार पदांपैकी १ पद पदवीधर शिक्षकाचे असल्याने त्यास २५% असे संबोधण्यात येत असे. पदवीधर म्हणून नियुक्त शिक्षकाने प्राप्त केलेली उच्च शैक्षणिक अर्हता आणि अध्यापन करावयाच्या विषयाच्या अनुषंगाने पदवीधर वेतनश्रेणी दिली जात होती. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम– २००९ नुसार इयत्ता ६ वी ते ८ वी साठी शिक्षक निकष निश्चित केल्यानंतर आवश्यक असे वेगवेगळे शासन आदेश निर्गत करून सदर इयत्तांना अध्यापन करण्यासाठी (१) गणित– विज्ञान (ळळ) भाषा (ळळळ) सामाजिक शास्त्र विषयासाठी स्वतंत्रपणे पदवीधर शिक्षक निश्चित करण्यात आलेत.परंतु – तीनही पदवीधर शिक्षकांना समान कामासाठी समान वेतन या न्यायसंगत तत्त्वाकडे दुर्लक्ष करीत शासन परिपत्रक क्र. वेतन १२९६/प्र.क्र. १२३/ टीएनटी–३ दि. १३ ऑक्टोबर २०१६ नुसार विषय निहाय ३३% पदांनाच पदवीधर वेतन श्रेणी अनुज्ञेय करण्यात त आली आली आहे. आहे.

पदवीधर विषय शिक्षक वेतनश्रेणी च्या मागणीची दखल घेऊन कालापव्यय न करता शिघ्रतेने आदेश काढण्याच्या मागणीची सोडवणूक व्हावी म्हणून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी विषय पदवीधर शिक्षक वेतनश्रेणी संघर्ष समिती ने शिक्षक दिनी ५ सप्टेंबर २०२४ रोजी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात धरणे सत्याग्रह आयोजित केला आहे.या आंदोलनालासमहाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती या धरणे सत्याग्रहास सक्रिय पाठिंबा देत असून शासनाने विषय पदवीधर वेतनश्रेणी मंजुरीचे आदेश निर्गत करावे अश्या मागणीचे निवेदन प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे व राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी दिले आहे असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मध्ये 'दही-दांडी' उत्साहात साजरी

## विद्यार्थ्यांनी डीजे च्या तालावर नाचत पावसाचा घेतला आनंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती–** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती येथे गोकुळाष्टमी च्या पार्श्वभूमीवर नुकताच दहीदांडी चा सोहळा महाविद्यालयातीळ विद्यार्थ्यांकरिता संपन्न झाला . यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्सवात डीजे च्या तालावर नाचत पावसाचा आनंद घेत दांडीचा उपयोग करत मटकी फोडली.पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अंतर्गत येणाऱ्या अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी , आयुर्वेद, आर्किटेक्चर, नर्सिंग महाविद्यालयांच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या जवळपास ४२ स्वतंत्र चमू ने या स्पर्धे मध्ये सहभाग घेतला. या स्पर्धेत मानवी मनोरे रचत दांडी चा उपयोग करत मटकी फोडण्याच्या अनोखा प्रयोग असल्याने विद्यार्थ्यांनी सुद्धा मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

या स्पर्धेत मुलांमध्ये पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीच्या सीव्हील इंजिनिअरिंग विभागाने प्रथम पारितोषिक पटकावले तसेच द्वितीय पारितोषिक एमसीए च्या विद्यार्थ्यांनी मिळविले. त्याचप्रमाणे मुलींमध्ये पी. आर. पोटे पाटील कृषिमहाविद्यालयाने प्रथम पारितोषिक तर पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाने दुसरे



पारितोषिक मिळविले.

आधुनिक युगाकडे वाटचाल करत असताना आपले महाराष्ट्रातील साजरे होणारे सण उत्सव या नवीन पिढीने सुद्धा अंगिकारावे तसेच दहीदांडी या सोहळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना बऱ्याच गोष्टी शिकण्या सारख्या असतात यात प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी चमू बनवण्याकरिता साथीदारांची निवड करणे , मानवी पिरॅमिड बनवणे आणि समयोचित नियोजन करून सोयीस्कर –कठीण उंचीवर बांधलेले दह्याने भरलेले मातीचे मडके फोडणे यांचा समावेश आहे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे व आपले कला कौशल्य विकसित करता यावे या हेतूने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम संस्थेमध्ये साजरे केल्या जात असल्याचे प्रतिपादन संस्थेचे सचिव मा. श्रेयशदादा पोटे पाटील यांनी यावेळी केले.या दहीदांडी सोहळ्याला प्रकाशजी पुंड, एड. प्रविणजी मोहोड, पी. आर. पोटे पाटील ग्रुपचे संचालक, सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य , उपप्राचार्य, सर्व डीन, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कावड यात्रेदरम्यान युवकाचा अपघाती मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ दर्यापूर** :लाखपुरी येथून निघालेल्या कावडला धडकून दुचाकीस्वार युवकाचा मृत्यू झाला. तर एकजण गंभीर जखमी झाला. ही घटना गणेशपूर फाट्यासमोर रविवारी रात्री ११ वाजता दरम्यान घडली. अनिल सुरेश एकादशे (२७, खोलापुरी वेश, दर्यापूर) असे अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वार युवकाचे तर, विशाल भाष्कर चव्हाण (२७, कोकर्डा) असे जखमी युवकाचे नाव आहे. अनिल दुचाकीने लाखपुरी येथील मंदिरात कावड यात्रा पाहण्याकरीता गेला होता. दर्यापूरकडे येत असताना कोकर्डा येथील कावड घेऊन काही युवक रस्त्याने चालत होते. दुचाकी स्वाराला कावड घेऊन जात असलेले युवक दिसले नसल्याने कावडला जबर धडक लागून तो खाली कोसळला. डोक्याला जबर मार लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तर कावड घेऊन जात असलेला विशाल अपघातात जखमी झाला.

# मराठवाडा,विदर्भात पूरस्थिती; शेकडो गावांचा संपर्क तुटला, शेतशिवारात पाणीच पाणी, पिकांचा चिखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३ अमरावती** मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशातील जिल्ह्यांना सोमवारीही अतिवृष्टीने झोडपून काढले आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या मराठवाड्याला सलग तिसऱ्या दिवशी मुसळधार पावसाचा तडाखा बसल्याने पूरपरिस्थिती निर्माण होऊन हाहाकार उडाला. नदी–नाल्याकाठच्या गावांना फटका बसला. अनेक घरांमध्ये पुराचे पाणी शिरल्याने नुकसान झाले. शेकडो गावांचा संपर्क तुटला. विदर्भात यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा, अकोला जिल्ह्यांतील शिवारं जलमय झाली आहेत. नांदेड जिल्ह्यात एसडीआरएफचे पथक तैनात केले आहे. जायकवाडी धरण ८८ टक्के भरले आहे. या अतिवृष्टीत ४ लोकांना प्राण गमवावे लागले असून, १७ जण जखमी झाले आहेत. ८८ जनावरांचा मृत्यू झाला असून, १६० कच्च्या घरांची पडझड झाली आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# आदिवासी उमेदवार भरती प्रक्रिया अन् नियुक्ती आदेशाच्या प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३अमरावती :**

राज्यातील सर्वच विभागातील सर्व संवर्गांची भरती प्रक्रिया जवळपास आटोपली असून, केवळ अनुसूचित क्षेत्रातील १७ संवर्गातील आदिवासी उमेदवारांची भरती प्रक्रिया रखडली आहे. राज्य शासन बुधवार, ४ सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयाला विनंती करून 'सर्वोच्च' निर्णयाच्या अधीन राहून आदिवासी उमेदवारांना नियुक्ती आदेश, थेट नेमणुका देण्याबाबत विनंती करणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. यासंदर्भात राज्य शासनाने २७ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले, हे विशेष.

तत्कालीन राज्यपाल विद्यासागर राव यांनी ५वी अनुसूचीच्या पॅरा ५ (१) नुसार अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या भरतीसंबंधात जनजाती सल्लागार परिषदेच्या शिफारशीनुसार २९ ऑगस्ट २०१९ रोजी अध्यादेश काढून लोकसंख्येच्या प्रमाणात १०० टक्के, ५० टक्के आणि २५ टक्के (कोतवाल आणि पोलिसपाटीलवगळता) आरक्षण दिले आहे. या अधीसूचनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने १ फेब्रुवारी आणि २८ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. मात्र, सदर अधिसूचना आणि शासन निर्णयाला सामाजिक विकास प्रबोधिनी आणि बिगर आदिवासींनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने २७ सप्टेंबर २०२३ रोजी या सर्व याचिका अंतरिम याचिकांसह फेटाळल्या. या निर्णयाविरूद्ध पुन्हा सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २२१०९ /२०२३ ही ३० सप्टेंबर २०२३ रोजी दाखल करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयात १३ ऑक्टोबर २०२३ रोजी सुनावणी झाली. या आदेशात न्यायालयाने पेसा भरती प्रक्रियेला स्थगिती किंवा भरती प्रक्रिया थांबवा, असेही म्हटले नाही. परंतु, सामान्य प्रशासन विभागाने १३ ऑक्टोबर २०२३ आणि महसूल व वन विभागाने १७ ऑक्टोबर २०२३ रोजी पत्र काढून अनुसूचित क्षेत्रातील भरती प्रक्रिया थांबवली. पुढे मात्र आदिवासी उमेदवारांना वगळून 'सर्वोच्च' निर्णयाच्या अधीनस्त राहून बिगर आदिवासी उमेदवारांना नियुक्त्या दिल्या आहेत. यावेळी मात्र न्यायालयाची कोणतीही परवानगी घेतली नाही. दरम्यान, राज्यात बेरोजगार आदिवासी उमेदवारांच्या विविध आंदोलनाची दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्काळ २९ ऑगस्ट २०२४ रोजी सह्याद्री अतिथीगृहावर आदिवासी बांधवांची बैठक घेऊन नियुक्ती आदेश देण्याची ग्वाही दिली आहे.

### या अधिसूचनांचा फायदाच नाही

- ९ जून २०१४
- १४ ऑगस्ट २०१४
- ३१ ऑक्टोबर २०१४
- ३ जून २०१५
- ९ ऑगस्ट २०१६
- २३ नोव्हेंबर २०१६

### हे आहेत पेसा क्षेत्रातील १३ जिल्हे

राज्यात एकूण ३६ जिल्हे आहेत. यापैकी १३ जिल्हे हे आदिवासी बहुल आहे. यात ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे .या १३ जिल्ह्यातील पेसा क्षेत्रामधील १७ संवर्गातील केवळ आदिवासी उमेदवारांची भरती प्रकिया रखडली आहे.

# अमरावती मध्यवर्ती कारागृहात बुद्धिबळ,कॅरम स्पर्धा

## ८० कैद्यांचा समावेश ; ध्वज दिनाचे औचित्य




विदर्भ प्रजासत्ताक
दि३अमरावती

राज्याच्या कारागृह विभागाचा रविवार, १ सप्टेंबर रोजी ध्वजदिन अमरावती मध्यवर्ती कारागृहामध्ये साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रध्वज आणि कारागृह विभागाच्या ध्वजाचे ध्वजारोहण अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांचे हस्ते करण्यात आले. दरम्यान बंदीजनांसाठी बुद्धिबळ, कॅरम स्पर्धा अन् सामान्य ज्ञान परीक्षा घेण्यात आल्या. महाराष्ट्र कारागृहाच्या ध्वज दिनानिमित्त अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा प्रशांत बुरडे, पुणे येथील कारागृह व सुधारसेवा, मुख्यालयाचे विशेष पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांच्या संकल्पनेतून स्वाती साठे यांचे मार्गदर्शनात बंद्याकरिता विविध बौद्धिक व मनोरंजानात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यावेळी मनोहर भोसले यांचेकरवी रक्षकसंवर्गीय कर्मचाऱ्यांनी परेड संचलन करून ध्वजाला मानवंदना दिली. त्यानंतर अमरावती मध्यवर्ती कारागृहात बंद्यांसाठी समता फाऊंडेशन, मुंबई या संस्थेच्या सहकार्याने बुद्धिबळ स्पर्धा, कॅरम स्पर्धा, सामान्य ज्ञान परीक्षा पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांनी केले. बंद्यांची वर्गवारी करून त्यानुसार स्पर्धा घेण्यात आली. बुद्धिबळ स्पर्धेमध्ये १८ बंद्यांनी, – कॅरम स्पर्धेमध्ये ३२, तर सामान्य ज्ञान – परीक्षेमध्ये ३० बंद्यांनी सहभाग घेतला. – मुक्त वातावरणामध्ये खेळाचा व स्पर्धेचा आनंद बंदीजनांनी घेतला. या स्पर्धेमध्ये सहभागी सर्व बंद्यांना समता फाऊंडेशनच्या वतीने बक्षीस व प्रमाणपत्राचे लवकरच वाटप केलेजाणार आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी उपअधीक्षक प्रदीप इंगळे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी शामराव गिते, रवींद्र रावे, मिलींद बनसोड, सर्कल तुरुंगाधिकारी मनोहर भोसले, उमेश गुंडे तसेच कारागृह शिक्षक संजय घोलप, ललित मुंडे व समता फाऊंडेशनचे अमरावती जिल्हा समन्वयक नागेश पळसकर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच सुभेदार प्रल्हाद इंगळे, हवालदार अशोक जाधव, कारागृह शिपाई राहुल पंधरे, सागर पाटील, कृष्णा सांबारे, विपीन राठोड आदींनी अथक परिश्रम घेतले.

# ग्रामीण भागातही वाढतोय हृदयविकार, वेळीच व्यसनांना घाला वेसण

## तरुणांतही प्रमाण अधिक तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करा



विदर्भ प्रजासत्ताक
दि.३मोर्शी

हृदयविकार आता वयाचे बंधन नाही. अलीकडे ऐन तारुण्यात हृदयविकाराचे प्रमाण वाढत आहे.. यापूर्वी शहरी भागात असणारे प्रमाण आता ग्रामीण भागातही दिसून येत आहे. त्यामुळे वेळीच सावध होत व्यसन टाळणे हिताचे ठरणारे आहे. तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व उपचार हिताचा ठरणारा आहे.

### पन्नाशीनंतर दोन तपासणी गरजेची

नागरिकांनो, रिस्क फॅक्टर ओळखा. हृदयाशी निगडित काही लक्षणे आढळल्यावर वेळेवर उपचार घ्या. 'टाइम इज मसल्स' असे डॉक्टर म्हणतात. त्यामुळे वेळेचे भान ठेवून निर्णय घेतला पाहिजे.हृदयविकाराची समस्या आल्यास ६० मिनिटांच्या आत उपचार झाल्यास निश्चितच रुग्णाचे प्राण वाचतात. त्यामुळे वयाच्या ४० वर्षांपर्यंत दोन वर्षातून एकदा इको व टीएमटी करणे गरजेचे आहे. वयाच्या पन्नाशीनंतर वर्षातून एकदा ही चाचणी करावी, असे तज्ज्ञ डॉक्टरांचे म्हणणे आहे.

दरवर्षी हृदयविकारामुळे ३२ टक्के लोकांना जीव गमवावा लागतो. पूर्वी हृदयविकाराचा आजार हा साधारणतः पन्नाशीनंतर येत असे. कुठलाही त्रास न होता झटक्यात मरण येत आहे. हल्ली तिशीतील तरुणांचाही हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे 'रिस्क फॅक्टर ओळखा अन् हृदयविकार टाळा,' असा मौलिक सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. यापूर्वी हा आजार शहरी भागापुरताच मर्यादित होता; परंतु ग्रामीण भागातही या आजाराचे प्रमाण वाढले आहे.

### अशी आहेत हृदयविकाराची कारणे

हृदयविकाराला तंबाखूचे सेवन घातक आहे. अलीकडे युवकांमध्ये हे प्रमाणा अधिक वाढले आहे. अंग मेहनत करण्याचा आळसही याला कारणीभूत आह नेहमीच्या जीवनशैलीत काही बदल आल्यास नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा; मात्र युवकांकडून ॲसिडिटीच्या नावाखाली त्याकडे दुर्लक्ष केले जाते प्रकृती थोडीच बिघडली, असा विचार करूनही अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करताना दिसून येतात.

भविष्यात असंसर्गजन्य आजारांच्या प्रमाणात सर्वाधिक वाढ या आजाराची होईल. यामध्ये कॅन्सर, हृदयविकार, हायपरटेन्शन तथा मधुमेह आदी आजारांचा समावेश राहील, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. मृत्यूचे मोस्ट कॉमन कॉझ हे हृदयविकार आहे. लक्षणे आढळल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नका. ज्यांना कुठलेच व्यसन नाही किंवा जे शाकाहारी आहेत, त्यांच्यात व्हिटॅमिन १२ ची कमतरता आढळते. त्यामुळे होमोसिस्टिल होऊन हृदयविकाराची शक्यता बळावते, असेकार्डियोलॉजिस्ट डॉक्टरांनी सांगितले. सावधानता अतिशय गरजेची आहे.

# यंदा बांबूच्या वस्तूंची मागणी मंदावली



विदर्भ प्रजासत्ताक
दि.३परतवाडा

यंदा बांबूच्या वस्तूंची मागणी मागील वर्षीपेक्षाही मंदावली असल्याची खंत आदिवासीं बांधवांनी व्यक्त केली आहे. काही वेळा बांबूचा पुरवठाही वेळेवर होत नाही. त्यावेळीही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात बैल जोडी लिप्त होत असल्याने विशेषतः बैल पोळा उत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक घरी आधी एक टोपली सर्जाराजाला अन्न वाढण्यासाठी आणली जाते. त्याचा आधी मोठ्या प्रमाणात उपयोग होत असे.आता मात्र बैलजोडी गावागावात बोटावर मोजण्याइतके असल्याने,तसेच प्लास्टिक वस्तूंमुळेसुद्धा बांबूच्या आहे.वस्तू मागणीत लक्षणीय घट होत आहे.यामुळे बांबूपासून निर्मित वस्तूंना मागणी घटत असल्याचे दिसून येत परिणामी व्यावसायिकांनाही हा परंपरागत व्यवसाय करावा तरीकसा असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# जिल्ह्यातील चौघांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



विदर्भ प्रजासत्ताक
दि.३ अमरावती

एका महिलेसह जिल्ह्यातील चार शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार घोषित झाला आहे. आगामी ५ सप्टेंबर या शिक्षक दिनी मुंबई येथे या पुरस्कारांचे वितरण केले जाईल. रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

निवड झालेल्या चौघांपैकी तीन शिक्षक जिल्हा परिषदेचे असून एक शिक्षक खाजगी शाळेवर कार्यरत आहे. प्राथमिक विभागातूनधामणगाव रेल्वे तालुक्यातील कासारखेडा येथील शिक्षक श्रीकृष्ण चव्हाण यांची निवड झाली आहे. तर माध्यमिक विभागातील पुरस्कार कुंड सर्जापुर (ता. अमरावती) येथील चंद्रभानजी विद्यालयाचे क्रीडा शिक्षक शरद गढीकर यांना दिला जाणार आहे.आदिवासी विभागात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल चिंचखेडा (ता. चिखलदरा) येथील शिक्षक प्रमोद दखने यांना जाहीर झाला असून महिला संवर्गातील पुरस्कार वाढोणा (ता. अचलपुर) येथील

सुनीता लहाने यांना दिला जाणार आहे. निवड झालेल्यापैकी गढीकर हे खाजगी यंत्रणेत कार्यरत आहेत. तर उर्वरित तिन्ही शिक्षक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अध्यापनाचे कार्य करतात. दरम्यान निवड झालेल्या सर्व शिक्षकांचे सर्व क स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# महिला महाविद्यालय येथे आंतर कनिष्ठ महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन



विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ संचालित महिला महाविद्यालय कनिष्ठ विभाग येथे कै. दादासाहेब खापर्डे यांच्या जयंती उत्सवा प्रित्यर्थ दि. २७ ते २९ ऑगस्ट या दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवार दि २७ तारखेला नूतन विदर्भ शिक्षण मंडळ अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळा तसेच महिला महाविद्यालय कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थिनींची एकत्रित रॅली काढण्यात आली. विद्यार्थिनींनी वंदे मातरम, महिला सुरक्षा, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संरक्षण इत्यादी महत्त्वाच्या मुद्द्यांवर हिरीरीने घोषणा देत रॅलीमध्ये सहभाग घेऊन परिसर दणाणून सोडला. बुधवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी वरिष्ठ महाविद्यालयामध्ये ईडीपी अंतर्गत व्यवसाय मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आणि गुरुवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी आंतर कनिष्ठ महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धेचे आयोजन कनिष्ठ महाविद्यालयातर्फे करण्यात आले होते.

वकृत्व स्पर्धेकरिता विचारमंचावर अध्यक्ष म्हणून नूतन विद्यालय शिक्षण मंडळाचे मंडळ प्रतिनिधी प्रा. रविभाऊ खांडेकर तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून विज्युक्टाचे माजी अध्यक्ष प्रा. अरविंद मंगळे, संस्थेच्या सहसचिव प्रा. ममता पांडे, प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, कनिष्ठ विभागाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते उपस्थित होत्या. वकृत्व स्पर्धेला परीक्षक म्हणून अमरावतीतले नावाजलेले परीक्षक बियाणी विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. सुरज हेरे, महिला महाविद्यालयातील संगीत विभागाच्या प्रा. डॉ. शर्मिला देशमुख तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेले वकृत्व आणि वादविवादपटू श्री भीम बारसे उपस्थित होते. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे खास कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली ही पहिली वकृत्व स्पर्धा होती. त्यामुळे अमरावती शहरातील शैक्षणिक परिसरातील सर्वच कनिष्ठ महाविद्यालयातून उत्स्फूर्त असा विद्यार्थ्यांचा सहभाग यावेळी मिळाला. तसेच स्पर्धेचे वैशिष्ट्यपूर्ण विषय आणि भरघोस पारितोषिकाची रक्कम हीदेखील या स्पर्धेचे विशेष आकर्षण होते. प्रसार माध्यमातील स्त्री पात्रांच्या भूमिकेबद्दल तरुणांची भूमिका, वारंवार घडणाऱ्या नैसर्गिक आपत्ती व त्यावरील उपाय योजना, नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण प्रक्रियेत होणारे बदल आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या वापरामुळे निर्माण होणारे संभाव्य धोके व त्याचा वाढता प्रभाव असे विविध पैलूंना स्पर्श करणारे विषय स्पर्धेकरीता निवडण्यात आले होते.

प्रा. अरविंद मंगळे यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले तसेच यामुळेच विद्यार्थ्यांमध्ये वकृत्वकला वाढीस लागून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होऊ शकेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अध्यक्ष प्रा. रवींद्र खांडेकर यांनी स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच भविष्यातही असे उपक्रम आयोजित केल्यास संस्था सदैव पाठीशी राहील याची ग्वाही दिली. प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी प्रास्ताविके तून स्पर्धाघेण्यामागील भूमिका विशद केली.वकृत्व स्पर्धेकरिता विविध ३० कनिष्ठ महाविद्यालयातून ५० स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्पर्धा संपल्यानंतर लगेच बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला.अत्यंत पारदर्शक पद्धतीने परीक्षण केल्यानंतर परीक्षकांनी पाच स्पर्धकांना विजयी घोषित केले. यामध्ये शिवाजी विज्ञान महाविद्यालयाची खुशी गजानन गावनेर हीने प्रथम तर विद्याभारती महाविद्यालयाची मनस्वी राजेंद्र तायडे हीने द्वितीय तसेच शासकीय विदर्भ महाविद्यालय येथील पूर्वा मुरलीधर केवटी हीने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच प्राप्ती गोपीचंद परांजपे व आलोक नारायण दामोदर या अनुक्रमे शिवाजी विज्ञान महाविद्यालय व विद्याभारती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात आली.

# आमदार रवी राणा बडनेरा,अंजनगाव बारी,भातकुली आदी भागातील गावा गावात जाऊन पोळ्याच्या उत्सवात सहभागी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.३बडनेरा

क्षण बैलांच्या ऋणातून उतराई होण्याचा,उत्सव शेतकऱ्यांच्या आनंदाचा,वर्षभर बळीराजासाठी राब राब राबणाऱ्या बैलांना एक दिवस आराम देऊन त्यांचे पूजन करण्याचा दिवस म्हणजे बैलपोळा,या निमित्ताने भूमिपुत्र आमदार रवी राणा यांनी आज आपल्या शेतातील बैलांचे मनोभावे पूजन करून त्यांना गोडधोड खाऊ घातले, यांत्रिक शेतीच्या आधुनिक युगात आजही बैलांचे महत्व अनन्यसाधारण असून शेतकरी आणि बैल हे युगायुगाचे नाते पुढेही कायम राहावे अशी प्रार्थना करून आमदार रवी राणा यांनी तमाम कष्टकरी,शेतकरी,शेत मजुरांना बैलपोळ्याच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या.यानंतर आमदार रवी राणा यांनी जुनी वस्ती बडनेरा,अंजनगाव बारी,भातकुली आदी भागातील गावा गावात जाऊन पोळ्याच्या उत्सवात भाग घेऊन शेतकऱ्यांच्या आनंदात सहभाग घेतला व पोळ्याच्या सणाच्या शुभेच्छा दिल्या.




# बैलपोळा स्पर्धेच्या निमित्ताने सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन - नितीन कदम

## कदम यांच्याकडून उत्कृष्ट जोड्यांना रोख बक्षीस व पारितोषिके वितरित

विदर्भ प्रजासत्ताक
दि.३अमरावती

देशाच्या कृषिप्रधान संस्कृतीत शेतकरी मित्र सर्जा राजाच्या श्रमाला अनन्य महत्व आहे त्याचा सहकार्यप्रती कृतज्ञनता व्यक्त करण्यासाठी सम्पूर्ण महाराष्ट्रात बैल पोळा हा सण मोट्या उत्साहात साजरा करण्यात येतो या पारंपरिक सनाचा उत्साह वाढविण्यासाठी यंदा बैलपोळ्याच्या दिवशी बडनेरा विधानसभा क्षेत्रातील पार्डी व उतखेड गावामध्ये बैलपोळा सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांच्या संकल्पनेतून बडनेरा विधानसभा क्षेत्रातील पार्डी व उतखेड येथे सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असतांना गावामध्ये आकर्षण सजावट असणाऱ्या तीन बैलजोड्याचे परीक्षण करण्यात येऊन त्याठिकाणी विजेत्याना रोख बक्षीस व पारितोषिके वितरित करण्यात आले.

नितीन कदम यांनी आपल्या मनोगताव्दारे, हा दिवस शेतकऱ्यांच्या कष्टाचा आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्याचा दिवस देखील आहे. बैलांची पूजा करून त्यांच्या पाठीशी असलेल्या शेतकऱ्यांचेही कौतुक केले जाते.बैलपोळा हा सण फक्त एका दिवसाचा उत्सव नसून तो आपल्या शेती परंपरा, निसर्गाशी



असलेला संबंध आणि ग्रामीण जीवनशैली यांचं जतन करतो. बैलपोळा हा उत्सव शेकडो वर्षांपासून साजरा केला जातो. यामुळे तो ग्रामीण परंपरांचं जतन करण्याचं काम करतो. नवीन पिढीला आपल्या शेती आणि जमीन यांचं महत्व कळवण्यासाठी हा सण महत्वाचा ठरतो. असे म्हणाले. यामध्ये संघशिल बेर्डे यांच्या बैलजोडीने संकल्प शेतकरी संघटना आयोजित पार्डी येथील 'सर्जाराजा सजावट स्पर्धेत' अव्वल स्थान पटकावत ५१००/– रुपये रोख, गोपाल वगारे यांच्या जोडीने ३१००/– रोख, देविदास कोंडे यांच्या जोडीने २१००/– रोख त्याचप्रमाणे उतखेड येथील रमेश रंगारी यांच्या बैलजोडीने ५१००/– रोख, विष्णू कोरडे यांच्या जोडीने ३१००/– रोख, क्रिश ठाकरे यांच्या जोडीने २१००/– रोख जिंकत यांना कदम यांनी पारितोषिक वितरित केले. यावेळी सदर गावामध्ये एकच हर्शोल्हासाचे वातावरण बघायला मिळाले.दरम्यान यावेळी संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांच्या समवेत राजू पिसे,निलेश मोगरे,नामदेवराव बारी काका,भेंडे काका,पांडुरंग कुरडकर,दिलीप पाटील,प्रकाश भोयर,अक्षय कडव, त्याचप्रमाणे संघटनेचे स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी, गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमरावती जिल्ह्यातील एसटी कर्मचारी आक्रमक

## जिल्ह्यात एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू : एसटी सेवा ठप्प



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**


एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे करावे या मागणीसाठी एसटी कर्मचाऱ्यांच्या कृती समितीने आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे,अमरावती जिल्हा मध्यवर्ती बस स्थानक व ग्रामीण भागातील सर्व एसटी डेपो बंद असून सर्व एसटीचे चाके थांबली आहे,तर एसटी कर्मचाऱ्याचं आंदोलन सुरू झाल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले आहे तर दुसरीकडे अमरावती एसटी बस स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी निर्माण झाली आहे तर सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी देण्यात आली आहे.

यापूर्वी राज्य परिवहन मंडळाच्या कर्मचारी संघटनेने ९ आणि १० जुलै रोजी धरणे आंदोलन केले होते. आता कामगार संयुक्त कृती समितीच्यावतीने ३ सप्टेंबरपासून धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विविध मागण्यांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्तरावर मागण्यांबाबत तोडगा निघाला तरच आंदोलन मागे घेण्यात येईल, असे संघटनेकडून सांगण्यात येत आहे.अमरावती जिल्हा मध्यवर्ती बसस्थानक आणि ग्रामीण भागातील सर्व एसटी डेपो बंद आहेत. कर्मचाऱ्यांनी या डेपो बाहेरच आंदोलनाला सुरुवात केली आहे. नगर जिल्ह्यातही अशीच परिस्थिती दिसून येत आहे. संगमनेर डेपोतून धावणाऱ्या बस सध्या आगारातच उभ्या आहेत. या संपामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. सरकारकडून जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संप मागे घेतला जाणार नाही असा निर्धार कामगारांनी व्यक्त केला आहे. या संपाला आता राज्यातील अन्य जिल्ह्यांतूनही प्रतिसाद मिळू लागला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर समाधानकारक तोडगा काढला गेला नाही तर आंदोलनाचे लोण राज्यभरात पोहोचण्याची शक्यता व्यक्त होत आहे.मुख्यमंत्री यांच्या स्तरावर अद्याप बैठक झाली नसल्यामुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. यावर तोडगा निघत नाही तोवर आंदोलन मागे घेणार नसल्याचे आंदोलक सांगतात.

**मागण्या काय?**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन. २०१८ ते २०२४ पर्यंतच्या वाढीव महागाई भत्त्याची थकबाकी. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ. ५८ महिन्यांच्या कालावधीची वार्षिक वेतनवाढीची थकबाकी. ५७ महिन्यांच्या कालावधीचा घरभाडे भत्त्याची थकबाकी.

# वर्गणी गोळा करण्यापूर्वी धर्मदाय आयुक्तांची परवानगी घेतली का? गणेश मंडळांना करावा लागणार अर्ज




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३अमरावती**

मंडळाचे नव ब्लर करनेअमरावती जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्याउत्साहात व भक्तीभावाने साजरा केला जातो. गावखेड्यांसह शहरात विविध गणेश मंडळांतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कार्यक्रमांचा खर्च भागविण्यासाठी तसेच धार्मिक व सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांकरिता वर्गणी गोळा केली जाते. मात्र, वर्गणी गोळा करण्यापूर्वी धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेणे गरजेचे आहे. अन्यथा तीन महिन्यांपर्यंत साधा कारावास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते.

गणेशोत्सवासाठी लहान अथवा मोठ्या स्वरूपाच्या गणेश मंडळांना वर्गणी गोळा करण्यापूर्वी धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक आहे. वर्गणीमध्ये रोख रक्कम किंवा वस्तूंच्या समावेश असू शकतो. वर्गणी किंवा देणगी गोळा करण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ४१– क नुसार सहायक धर्मादाय आयुक्त, यांची पूर्वपरवानगी घेणे गरजेचे आहे. आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज केल्यानंतर सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडून ऑनलाइन परवानगी, प्रमाणपत्र देण्यात येते. लहान, मोठ्या मंडळांनी वर्गणी गोळा करण्यापूर्वी धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेणे कारवाई टाळण्याच्यादृष्टीने गरजेचे आहे.

### अर्जासोबत लागतात ही कागदपत्रे

मंडळाच्या सर्व सदस्यांची स्वाक्षरी असलेल्या ठरावाची प्रत, सर्व सदस्यांचे ओळखपत्र, जागेबाबत जमीन मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र, नगरसेवक, सरपंच किंवा प्रतिष्ठित व्यक्ती यांचे शिफारसपत्र, विद्युत बिलाची प्रत, शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र, मागील वर्षीचे परवानगीची प्रत, मागील वर्षाच्या– जमा खर्चाचा हिशेब, आदी कागदपत्रे अर्जासोबत जोडणे गरजेचे आहे.

### परवानगी न घेतल्यास होणार कारवाई

सहायक धर्मादाय आयुक्तांची परवानगी न घेता पैसा, वर्गणी किंवा देणगी गोळा केल्यास आणि तसा दोष सिद्ध झाल्यास, तीन महिन्यांपर्यंत साध्या कारावासाची किवा संकलित रकमेच्या किंवा अंशदानाच्या दीडपटीपर्यंत दव्यदंडाची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. मंडळांनी अर्ज करणे आवश्यक आहे.

## फसवणुकीच्या गुन्ह्यात आम्हाला दोषमुक्त करा; जरांगे पाटलांचा न्यायालयात अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३पुणे**

मराठा आंदोलनाते नेते मनोज जरांगे पाटील कोथरूड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यात न्यायालयात मंगळवारी सुनावणीसाठी हजर झाले. नाट्यनिर्मात्याची फसवणूक केल्याचा आरोप असल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यात नाटकासंबंधी करण्यात आलेल्या करारपत्रावर आपल्या सह्या नाहीत. फसवणूक करण्याचा आपला कोणताही उद्देश नव्हता. एफआयआरमध्ये नाव असले तरी आपल्याविरोधात सबळ पुरावे नसल्याने आम्हाला दोषमुक्त करून प्रकरण निकाली काढावे असा अर्ज मनोज जरांगे–पाटील यांनी न्यायालयात केला.

## ग्रामीण साज हरवला: गावा–गावांत दारू, सट्टा, जुगाराचा प्रवेश

# गावात मारबतीची हाकाटी लुप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ धामणगाव रेल्वे**

बैलपोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारबत, म्हणजे तान्हा पोळ्याचा दिवस. पहाटेच्या वेळी आडा, पिढा, ढेकूण, मोंगसा (मच्छर) घेऊन... जा...गे.... मारबत...! असे मोठ्यांना हाकाटी देण्याची पद्धत होती. समज असा की घरातील, गावातील वाईट गोष्टी यामुळे नष्ट होतात. आता ही हाकाटी ! लुप्त झाली आहे. गावा–गावांत दारू, सट्टा, जुगाराने प्रवेश केला. सण साजरा करण्याच्या पद्धती बदलल्या आणि ग्रामीण साजही हरवला.

अमरावती जिल्ह्यांत पोळ्याचा पाडवा मोठ्या उत्साहात साजरा होतो. पूर्वी घरातून मारबत काढण्याची प्रथा होती. पोळ्याच्या दिवशी घराच्या प्रवेशद्वारात बैलाच्या गोठ्याच्या दरवाज्यात दोन पडसाच्या झाडाच्या फांद्या ठेवतात. पाडव्याच्या दिवशी पहाटेच्या वेळी त्या फांद्या घेऊन आळा, पिडा, ढेकूण,मोंगसा, अशी मोठ्याने हाकाटी देतात. नंतर एक मातीचा दिवा आणि बिना हाताची बाहुली तयार करायची आणि सोबत आदल्या दिवशी बनविलेला पाहुणचारातील वडा, पुरी घेऊनगावाच्या सीमेवर नेत. ती बिना हाताची बाहुली पुरून मोठ्याने घेऊन जागे मारबत अशी हाकाटी देतात. बऱ्याच गावांमध्ये परंपरा आजही जोपासली जात आहे.

### गावात पोळ्याचा उत्साह कायम

गावातील बैलांची संख्या कमी झाली असली तरी सणाचा उत्साह कायम आहे. आजही प्रत्येकाच्या घरी बैलजोडीची पूजा



केली जाते. ज्याच्या घरी बैल जोडी नाही, सदर कुटुंब दुसऱ्याची बैलजोडी आणून पूजा करतात.

### अशी आहे आख्यायिका

आख्यायिका अशी आहे की, द्वापार युगात श्रीकृष्णाला स्तनपानातून विष पाजून ठार मारण्याच्या कपटी हेतूने पुतना राक्षसींनी सुंदर स्त्रीचे रूप धारन करून गोकुळात प्रवेश केला. नंदाच्या घरी कृष्ण पाळण्यात झोपला असताना त्याला स्तनपान करण्याचा प्रयत्न पुतना राक्षसींनी केला. कपटी हेतू बालकृष्णाने ओळखला आणि तो तिचा विष तिच्याच शरीरात भिनवला.नंदाच्या वाड्यात पुतणा राक्षसीन धारातिर्थी पडली ही ही वार्ता वार्ता सगळ्या गोकुळात पसरली. तिचा अगडबंब मृतदेह दरवाज्यातून बाहेर निघत नव्हता, तेव्हा हात तोडून बाहेर काढण्यात आले. मृतदेह गावाच्या सीमेवर नेऊन पुरण्यात आला. तेव्हापासून गावाच्या सीमेवर बिना हाताची बाहुली पुरली जाते.

# चोरीची वीज घ्याल तर कारवाई अटळ : डीजेच्या आवाजाची मर्यादा पाळाच; प्रशासकीय यंत्रणेचा गणेश मंडळांवर 'वॉच'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती**

गणेश उत्सवांसाठी मंडप, रोषणाई, देखावे, महाप्रसाद व इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीजव्यवस्था ही अधिकृत असणे आवश्यक आहे. मात्र, खर्च वाचविण्याच्या नादात काही मंडळांचे पदाधिकारी चोरीची वीज वापरतात. याबाबत महावितरणने यंदा कठोर धोरण अवलंबिले आहे. तसेच डीजेच्या आवाजाची मर्यादा न पाळणाऱ्या मंडळांवर प्रशासकीय यंत्रणेचे नियंत्रण असून नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाई होणार आहे.




महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या गणेशाच्या आगमनाला पाच दिवसच शिल्लक असून येणारागणेशोत्सव आनंददायी व निर्विघ्न पार पडावा यासाठी सार्वजनिक उत्सव मंडळांनी वीज सुरक्षेबाबत गांभीर्याने उपाय योजना कराव्यात ववीजपुरवठ्याच्या दराने सार्वजनिक उत्सवांसाठी उपलब्ध असलेली अधिकृत तात्पुरती वीजजोडणी घ्यावी असे, आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग महावितरणच्या अखत्यारितील सर्वधर्मीयांच्या सार्वजनिक उत्सवांनातात्पुरत्या वीजजोडणीसाठी घरगुती वीजपुरवठ्याच्या दराने वीज देणार आहे. त्यामुळे अनधिकृत वीजजोडणी टाळून सार्वजनिक उत्सवांकरिता अधिकृत वीजपुरवठा घ्यावा आणि सार्वजनिक सुरक्षेला महत्त्व द्यावे, या उत्सवांकरिताच्या मंडप, रोषणाई, देखावे, महाप्रसाद व इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था ही अधिकृत वीज कंत्राटदारांकडूनच करून घेण्यात यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे. तातडीच्या मदतीची संभाव्य गरज पाहता सार्वजनिक मंडळांनी संपर्क साधावा. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणच्या संबंधित भागातील अभियंता आणि जनमित्रांचे मोबाईल – क्रमांक जवळ ठेवावे, असे आवाहन – महावितरणच्या वतीने केले आहे.

### खबरदारी पाळा, वीज अपघात टाळा

सार्वजनिक गणेश मंडळांनी रोषणाई आणि मिरवणुकीतील देखाव्याच्या परिसरातील विद्युत तारा आणि खांबांना स्पर्श होणार नाही याची खबरदारी घ्यावी आणि जनरेटरसाठी स्वतंत्र न्यूट्रल घेणे आवश्यक आहे. वीजपुरवठा बंद असताना जनरेटर सुरू केल्यास एकाच न्यूट्रलमुळे जनरेटरमधील वीज ही लघुदाब वाहिनीत प्रवाहित झाल्याने अपघात होण्याची शक्यता असते. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यात मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य नागरिक सहभागी होतात. त्यांच्या आनंदावर विरजण पडू नये, कुठलीही अप्रिय घटना होऊ न देता भाविकांना सणांचा आनंद घेता यावा यासाठी खबरदारी बाळगावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# शहरात आज २४ ठिकाणी 'ड्रिंक अँड ड्राईव्ह' तपासणी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३अमरावती**

पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच आज (दि. ३) कर साजरी केली जाते. दरम्यान कर साजरी करत असताना कोणीही सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करु नये तसेच दारू पिऊन वाहन चालवू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. दरम्यान पोलिसांकडून शहरातील विवीध २४ ठिकाणी 'ड्रिंक अँड ड्राईव्ह' मोहीम राबवली जाणार आहे. त्यामुळे दारू पिऊन वाहन चालवताना कोणी आढळल्यास संबंधितांविरुद्ध थेट गुन्हा दाखल होणार आहे.




पोलिसांनी संपुर्ण शहरात तसेच आयुक्तालयाच्या परिसरात तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. पोळा आणि कर या दोन दिवसासाठी आयुक्तालयात ३० पोलिस निरीक्षक, ९० एपीआय, पीएसआय तसेच १२०० पोलिस अंमलदार व ३०० होमगार्ड असा सुमारे १६०० पेक्षा जास्त अधिकारी व अंमलदारांचा ताफा तैनातीला ठेवलेला आहे. शहरातील महत्वाच्या ठिकाणी फिक्स पॉइंट राहणार आहे. तसेच सातत्याने गस्त सुरू राहणार आहे. यादरम्यान वाहनचालकांवर पोलिसांचे विशेष लक्ष राहणार आहे. त्यामध्ये स्टंटबाजी करणारे पोलिसांच्या रडारवर आहेत. पोलिसांसोबत शहर वाहतूक विभागाचे पोलिससुद्ध लक्ष ठेवून आहेत.

# ऐन सणासुदीत कांदा, लसणाची फोडणी महागली : कोथिंबीर पोहचली ४०० च्या पार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३ अमरावती**

गेल्या दोन महिन्यांपासून कांदे व लसणाचे दर सातत्याने वाढतच आहेत. आता पोळा सणाच्या कालावधीत तर भाजीपाला महागल्याने सामान्यांना चांगलाच घाम फुटत आहेत. बाजारात कांदे ६० ते ७० रुपये किलो तर लसूण ४०० रुपये किलो दराने विकला जात आहे.त्यामुळे ऐन सणासुदीत भाजीची फोडणी महागली आहे.



महिनाभरापूर्वी भरपूर प्रमाणात पाऊस पडल्याने भाजीपाल्याचे दर कडाडले होते. मात्र, आता पाऊस पूर ओसरल्याने भाजीमंडईत भाजीपाल्याचे दर काहीसे स्थिर आहेत. किरकोळ भाजीपाला बाजारात भेंडी, फ्लॉवर, टोमॅटो, वांगी आदी भाज्यांचे दर चढलेलेच आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांची खरेदी करताना चांगलीच दमछाक होत आहे.यंदा जास्त पावसाअभावी नवीन भाजीपाला लागवड क्षेत्रात मोठी घट झाली आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे दर वाढण्याची भीती व्यक्त होऊ लागली आहे. नवीन भाजीपाला लागवड झाली नाही. त्यामुळे आवकही कमी होणार आहे. परिणामी भाजीपाल्याचे दर गगनाला भिडणार आहेत.

**कोथिंबीर अन् लिंबूही वधारले**

विशेषतः १५ दिवसांपूर्वी २०० रुपये प्रतिकिलो विकला जाणारा कोथिबीर आता ४०० रुपये किलो आहे. श्रावण महिन्यांत आणि गणेशोत्सवात मांसाहार वर्ज्य केला जातो. त्यामुळे लिंबूंची मागणी थंडावते. मात्र, आता गणेशोत्सव संपताच लिंबूंच्या मागणीत वाढ झाली आहे. त्यामुळे पाच रुपयाला एक लिंबू याप्रमाणे विक्री सुरू आहे. श्रावणात २० रुपयाला ५ लिंबू विकले जात होते. मात्र, आता तोच लिंबू ५ रुपयाला एक झाला आहे.

# पाकिस्तानचा दुसऱ्या सामन्यातही 'करेक्ट कार्यक्रम' : बांग्लादेशने घरात घुसून मारले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३रावळपिंडी**

सलामीच्या सामन्यात झालेल्या दारुण पराभवानंतर पाकिस्तानला आणखी एक मोठा झटका बसला. पाहुण्या बांगलादेशनेपाकिस्तानला दणका देत दुसरा सामना देखील जिंकला. यासह शेजाऱ्यांना आपल्या घरात सलग दहाव्या सामन्यात विजयापासून दूर राहावे लागले. खरे तर पाकिस्तानला मायदेशात झालेल्या मागील दहा सामन्यांमध्ये एकही विजय मिळवता आला नाही. शान मसूदच्या नेतृत्वातील पाकिस्तानी संघ अद्याप आपल्या पहिल्या विजयाच्या शोधात आहे. दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी पाकिस्तान




दौऱ्यावर गेलेल्या बांगलादेशने ऐतिहासिक कामगिरी करताना २–० ने मालिका खिशात घातली. दुसरा सामना जिंकण्यासाठी बांगलादेशला मोठा संघर्ष करावा लागला असली तरी त्यांच्या या कामगिरीने इतिहास रचला. दुसऱ्या सामन्यात बांगलादेशने सहा गडी राखून मोठा विजय मिळवला. १८५ धावांचे लक्ष्य गाठताना बांगलादेशने ४ बाद १८५ धावा करून मालिका आपल्या नावावर केली.

दुसऱ्या डावात पाकिस्तानने १७२ धावा करून बांगलादेशला विजयासाठी १८५ धावांचे आव्हान दिले. याचा कसाबसा पाठलाग करत बांगलादेशने विजय साकारला आणि पाकिस्तानला सलग दुसऱ्यांदा चीतपट केले.